नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १८१ * * अमरावती * शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## एसटीच्या यूपीआय मार्फत तिकीट विक्रीला पसंती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बससेवेमध्ये डिजिटल व्यवहारांना प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून फोन पे, गुगल पे व तत्सम यूपीआय पेमेंटच्या माध्यमातून तिकीट काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे. सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार एसटी महामंडळामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने यूपीआय व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण होत आहेत .
सप्टेंबर २०२५ महिन्यात ४९.७९ लाखांहून अधिक यूपीआय द्वारे तिकीट व्यवहार झाले असून त्यातून ६४.०० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. ऑक्टोबर महिन्यात ७७.३२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

# बंडोबांचे झेंडे उभेच!



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :

नागपूर महापालिकेसह राज्यातील सर्व २९ महानगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेदरम्यान उमेवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी आज हजारो उमेदवारांनी त्यांचे नामांकन मागे घेतले. तथापि, तिकीट नाकारले गेल्याने बंडखोरी करीत उमेदवारी दाखल करणाऱ्या अनेक बंडोबांनी आपले झेंडे उभेच ठेवले आहेत. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी केलेली मनधरणी तसेच प्रलोभन आणि टाकलेला दबावही कामी आला नाही. राज्यभरात भाजपा, शिंदेसेना, कॉंग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), मनसे अशा सर्वच पक्षांच्या अधिकृत उमेदवारांसमोर या बंडखोरांचे मोठेच आव्हान उभे ठाकले आहे.

नागपूर महापालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत मोठी घट झाली असून एकूण ३०२ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहे.
उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी गुरुवारी केवळ १२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले होते. मात्र, आज शुक्रवारी शेवटच्या दिवशी तब्बल २९० उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणूक रिंगणातील चित्र बरेचसे स्पष्ट झाले आहे. अंतिम दिवसापर्यंत अनेक उमेदवारांनी आपापल्या राजकीय समीकरणांनुसार आणि पक्षीय रणनीतीनुसार निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे.
लकडगंज झोनमध्ये सर्वाधिक ४३ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. मंगळवारी झोनमध्ये ३७, सतरंजीपुरा झोनमध्ये ३५, तर धंतोली आणि नेहरूनगर झोनमध्ये प्रत्येकी ३३ उमेदवारांनी माघार घेतली आहे. गांधी-महाल झोनमध्ये ३०, हनुमानगर झोनमध्ये २८, आसीनगर झोनमध्ये २७, धरमपेठ झोनमध्ये २४, तर लक्ष्मीनगर झोनमध्ये १२ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम टप्प्यानंतर अनेक प्रभागांतील लढती आता थेट आणि अधिक चुरशीच्या होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.
दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण झाली असून एकूण १२९४ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. छाननीदरम्यान ८० उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आले. वैध ठरलेल्या उमेदवारांमध्ये ५३५ महिला उमेदवारांचा समावेश असून, बाद ठरलेल्या अर्जांमध्येही ३९ महिला उमेदवारांचा समावेश आहे.
दुसरीकडे, मुंबई, पुणे, नाशिक या प्रमुख मनपासह अन्य महापालिकांमध्येही बंडखोरांनी अधिकृत उमेदवारांसमोर तगडे आव्हान उभे केले आहे.

# महाराष्ट्रात फक्त मराठीचीच सत्ती

### सारस्वतांच्या मेळयात मुख्यमंत्री फडणवीसांची स्पष्टोक्ती



■ अजित जगताप, सातारा, दि. २ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा महाराष्ट्रात फक्त मराठीचीच सत्ती असल्याचा पुनरुच्चार केला.
महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीचीच सत्ती आहे. इतर कोणत्याही भाषेची सत्ती नाही. पण इंग्रजी, फ्रेन्च व स्पॅनिश सारख्या परदेशी भाषांना पायघड्या घालायच्या आणि इतर भारतीय भाषांना विरोध करायचा हे योग्य नाही. सर्व भाषांचा सन्मान व्हावा, पण मातृभाषेचा सन्मान त्याहून अधिक झाला पाहिजे, असे ते म्हणाले. ▶▶ पान ८ वर

## इंदूरची अशी ही स्वच्छता



गेल्या दहा-बारा वर्षांपासून भारतामध्ये स्वच्छ शहरांची निवड केली जाते. त्यासाठी कोणते निकष लावले जातात ते आम्हाला माहित नाही परंतु, या निवडीमध्ये आपल्या प्रगतिशील महाराष्ट्राचे एकही महानगर नाही मध्य प्रदेशातील ज्या शहरावर अहिल्याबाईंनी राज्य केले. त्या शहरावर मात्र बदनामीचा एक मोठा शिक्का बसलेला आहे. हिंदीमध्ये एक म्हण आहे. ऊपर से टाम टू अंदर की राम जाने, अगदी तशीच परिस्थिती गेल्या अनेक वर्ष स्वच्छतेत देशातील क्रमांक एकचे शहर असलेल्या इंदूरची झाली आहे. इंदूर महानगरपालिकेच्या सामान्य नागरिकांच्या वस्तीमध्ये जलवाहिनी मधून झालेला पाणीपुरवठा प्रदूषित होता असे म्हणण्यापेक्षा विषारी होता, असे म्हणणे भाग आहे कारण त्या घटनेमध्ये १५ निष्पाप लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. मरण पावलेल्यांच्या टाळूवरचे लोणी खाण्यासाठी टपलेल्या इंदूर महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी एक अनधिकृत शौचालय बांधण्यात आले होते आणि त्यातील मळ किंवा मैला पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिनीत शिरला होता असे सांगितले. म्हणजेच १५ निरपराध नागरिक मरण पावल्यावर या अनधिकृत शौचालयाचा शोध लागलेला आहे. यावरून स्वच्छ इंदूरचा पोकळपणा आणि आत लपलेली अस्वच्छता यांनी किती मोठे अक्राळ विक्राळ रूप धारण केलेले आहे हे सहजच दिसून येते. इंदूर शहरात जे रस्ते आहेत त्यांची फारच मोठी गंमत आहे. येथे चारचाकी वाहनांना मोकाट रस्ते आणि दुचाकी वाहनांची गैरसोय अशी स्थिती आहे. इंदूरला मेट्रोसिटी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम सुरू आहे. तिथल्या धूळ प्रदूषणाबाबत न बोललेलेच बरे. पहिल्या क्रमांकाचे शहर म्हणवून घेणा ?या पुण्यश्लोक देवी अहिल्या यांच्या इंदूरचे हे महाभयानक वास्तव किती जीवघेणे आहे याची कल्पनाच यावरून येते. आता अशी वार्ता आहे की जे बिचारे मेले ते सुटले, मात्र जे जिवंत आहेत ते मरण यातना भोगत आहेत. त्यांचा म्हणजेच मरणयातना भोगणाऱ्यांचा आकडाही शेकड्यांमधला आहे. येथील आमदार कैलाश विजयवर्गीय हे आहेत. हे विजयवर्गीय येथील प्रथम नागरिक होण्याच्या मार्गावर होते पण मोदीजींनी त्यांचा विजय होऊ दिला नाही. हे शहर आणि तेथील खाऊगल्ली म्हणजे सराफा केवळ भारतातच नाही तर भारताबाहेरही सुप्रसिद्ध आहे. मग त्या प्रसिद्ध खाऊ गल्लीत बाहेरून बनवून जे पदार्थ आले असतील किंवा येत आहेत, ते अशा घाणेरड्या पाण्यात तयार करण्यात आले होते की काय असेही विचारता येईल. या संपूर्ण भयानक प्रकारा बाबतीत कोणीही स्पष्ट बोलत नाहीत. ज्या बिचाऱ्याने शौचालय बांधले तेव्हा त्याला कोणीच अडवले नव्हते, आता बळी गेल्यावर मात्र त्याच्यावर आरोप करण्यात येत आहे. म्हणजे एक दुसऱ्यावर आरोप करतो दुसरा तिसऱ्यावर आरोप करतो अशीही आरोपांची मालिका अखंडपणे सुरू आहे. या आरोपांच्या फैरी आणि एकूण घटनेचे गांभीर्य याबाबत मध्य प्रदेश उच्च न्यायालयानेच दखल घेतल्यामुळे चौकशा आणि निलंबने वगैरे होत आहेत. परंतु जे निष्पाप नागरिक मरण पावले त्यांची जबाबदारी कोणावर, या प्रश्नाचे उत्तर फार कठीण आहे. स्वच्छतेच्या नावावर गर्व करणाऱ्यांचे गर्वहरण करणारा आणि मृत्यू मार्गाला घेऊन जाणारा प्रदूषणाचा हा विषारी प्रहार इंदूर शहराची मोठीच बदनामी करीत आहे. या सर्व गोष्टी पाहिल्यावर थेट स्वर्गातून पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या डोळ्यांमधून टपाटप आसवे गळत असतील. मुख्य बाब अशी आहे की सामान्य माणसांच्या जीवाला जराही किंमत नसते. फारफार तर चार-आठ दिवस बोंबाबोंब होईल निलंबने होतील आणि पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' सारखा प्रकार होईल आणि पुढच्या वर्षीही याच शहराला पहिला क्रमांक दिला जाईल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## अण्णाभाऊ साठेंना भारतरत्न मिळावा

### संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील



■ सातारा : मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते असे विधान करून एका वेगळ्याच चर्चेचा बार उडवून दिला आहे.
मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अशी मागणी कुलकर्णी व जोशींनी केली. त्यामुळे बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते, असे ते म्हणालेत. विश्वास पाटलांनी यावेळी अण्णाभाऊ साठे यांचा भारतरत्न या देशाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान करण्याचीही मागणी केली.
विश्वास पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करत साताऱ्याची गौरवगाथा मांडली. ते म्हणाले, साहित्य संमेलन म्हणजे फक्त एक कार्यक्रम नसतो, तो आचार, विचार व देशाला दिशा देण्याचा कार्यक्रम असतो. मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात कॉंग्रेसची स्थापना होण्याच्या अगोदरपासून झाली.
▶▶ पान ८ वर

## भारतीय साहित्य विश्वाचा दलित साहित्य भक्कम आधारस्तंभ

### लेखिका मृदुला गर्ग



■ वृत्तसंस्था
सातारा, दि. २ :
साहित्यिक क्षेत्रातील सर्वात मोठी क्रांती म्हणजे दलित साहित्याची निर्मिती होय. मराठी साहित्य हे इतर भारतीय भाषांच्या तुलनेत नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. भारतीय भाषांमध्ये दलित साहित्य पहिल्यांदा मराठी भाषेतच लिहिले गेले.
मराठी दलित साहित्यातूनच इतर भाषिक साहित्यिकांनी दलित लेखनाची प्रेरणा घेत, त्यांच्या मागार्ने जात आपल्या भाषांमध्ये दलित साहित्याची निर्मिती केली. त्यामुळे मराठी साहित्यातील दलित साहित्य हा भारतीय साहित्य विश्वाचा भक्कम आधारस्तंभ ठरला आहे, असे प्रतिपादन देशपातळीरील ज्येष्ठ लेखिका, विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांनी केले. आपले बहुभाषिक संस्कृतीचे वैभव पाहताना असे लक्षात येते की, अनेक हिंदी लेखकांनी मराठी, बंगाली, उडिया आणि इतर भारतीय भाषांमधील साहित्यकृतींमधून प्रेरणा घेतली आहे. ही बहुभाषिक संपन्नता लेखकांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी यावेळी आवर्जून नमूद केले. ▶▶ पान ८ वर

## उमेदवारांना धमकावल्याचा राहुल नार्वेकरांवर आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरू दिले नाहीत, असा गंभीर आरोप एका तक्रारीद्वारे राज्य निवडणूक आयोगाकडे करण्यात आला आहे. ▶▶ पान ८ वर

## छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळासाठी वढू बुद्रुक येथे अडीच एकर जमीन

**महायुती सरकारचा ऐतिहासिक निर्णय**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :
स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या वढू बुद्रुक (ता. शिरूर) येथील समाधी स्थळाच्या विकासासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने, पुण्यातील के.ई.एम. रुग्णालयाच्या मालकीची वढू बुद्रुक येथील जमीन आता समाधीस्थळसाठी उपलब्ध होणार आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर हा आज निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, तुळापूर व वढू बुद्रुक येथील विकास आराखड्यात ग्रामस्थांच्या सूचना लक्षात घेण्यात याव्यात, असे फडणवीस यांनी पूर्वीच जाहीर केले आहे. ▶▶ पान ८ वर

## छत्रपती संभाजी पुस्तकातील चुका सुधारण्याची तयारी - विश्वास पाटील

■ वृत्तसंस्था, सातारा, दि. २ :
छत्रपती संभाजी महाराजांच्या बाबत संभाजी हे पुस्तक २००६ साली प्रकाशित झालेले होते. दोन ते तीन पिढ्यातील वाचकांनी या पुस्तकाला उदंड प्रतिसाद दिला आहे त्यामुळे संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना या पुस्तकाबद्दल अनावदनाने माझ्याकडून काही चूक झाली असेल तर ती मोठ्या मनाने तात्काळ मागे घेण्याची माझी तयारी अशी सावध भूमिका सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष साहित्यिक विश्वास पाटील यांनी स्पष्ट केले.
साताऱ्यातील साहित्य नगरीमध्ये संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी संभाजी या कादंबरी बाबत घेतलेली भूमिका आणि आंदोलनाचा दिलेला इशारा या पार्श्वभूमीवर विश्वास पाटील यांनी मवाळ भूमिका घेत पुस्तकातील चुका सुधारण्याची कबुली दिली.

## जसा सूर्याजी पिसाळ लक्षात राहिला तसा...

### ठाकरेंचा शिंदेंवर टोला



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :
जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ जसा ४०० वर्ष लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा खोचक टोला शिवसेना उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला आहे. उमेदवारांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरेंनी शिंदेंसह पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधला.
उद्धव ठाकरे म्हणाले, जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगर पालिकेची आहे. सूयार्जी पिसाळ सारखा गद्दारीचा टिळा ४०० वर्षे झाली तरी मिटला नाही तर या गद्दारांचे काय?
दोन गुजरात्यांच्या हातात आपल्याला मुंबई द्यायची नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर निशाणा साधला. आपण मनाने काम करावे, समोरून धनाचा वर्षाव मोठ्या प्रमाणावर होणार आहे. एकही जागा नतद्रष्टांच्या हाती द्यायची नाही. जे आता इथे आले आहेत ते सर्व निवडून आले पाहिजेत, असेही ठाकर म्हणाले.

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
NEW YEAR 2026 नवीन वर्षाच्या शुभेच्छा
श्री.सुशांत सुभाष बोडने
नवरगाव ता. सिंदेवाही

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
ओंकार कन्स्ट्रक्शन कंपनी कीन्ही
मुरमाडी ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर
प्रो. प्रा. ओमप्रकाश बकाराम परशुरामकर

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
श्री.संदीपभाऊ पिसे
भाजपा युवा अध्यक्ष तथा सदस्य ग्रामपंचायत नेरी

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
श्री.राहुल म.पिसे
शहर अध्यक्ष युवक कॉंग्रेस कमेटी, नेरी

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
श्री.शांताराम सेलवटकर
माजी उपसभापती पं स चिमुर

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
श्री.अंकुशभाऊ नन्नावरे
सामाजिक कार्यकर्ते नेरी ता.चिमुर जिल्हा-चंद्रपूर

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
श्री.भाष्कर अंड्सकर
जय जगन्नाथ काम्पुटर सेंटर नेरी ता.चिमुर

पुर्वी पेट्रोलियम यांचे कडून ६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
हिन्दुस्तान पेट्रोलियम HP
श्री.प्रविण मोतीराम वाघे
प्रो.प्रा.पूर्वी पेट्रोलियम नेरी, ता. चिमूर

क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले जयंती व ६६ व्या गोंदेडा गुंफा यात्रा महोत्सवाच्या व नवीन वर्षाच्या सर्व भावीक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
श्री.सुरेश डांगे
विभागीय अध्यक्ष, शिक्षक भारती नागपूर विभाग
सचिव,वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठान चिमूर

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भावीक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
ग्राम पंचायत पिपर्डा (प), ता. चिमूर
श्री.आकाश भेंडारे सरपंच
श्री.चंदन चुनारकर उपसरपंच
श्री.अरविंद आदे ग्रामसेवक
सदस्य सर्वश्री : सुजाता चुनारकर, सारिका मेश्राम, स्वाती चुनारकर, दर्शना भेंडारे, वनिता मानकर, दशरथ सहारे, भगवान कावळे, ग्रा पं कर्मचारी प्रमोद मेश्राम, प्रमोद बोरकर, प्रीतम तागडे

६६ व्या तपोभूमी गोंदेडा गुंफा यात्रेत येणाऱ्या सर्व भावीक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
ग्राम पंचायत मानमोहाडी, ता. चिमूर
श्री.राजेंद्र करारे सरपंच
श्री.देवानंद जिवतोडे उपसरपंच
श्री.सि.एस. मेश्राम ग्राम अधिकारी
सदस्य सर्वश्री : ग्रा.पं सदस्य मिलिंद रामटेके,सौ प्रतिभा मुंढरे, सौ.प्रतिभा खाटे, कु.पुनम टेंभुर्णे, सौ.अश्विनी ढोके, ग्रामपंचायत कर्मचारी अरुण चौधरी रोजगार सेवक, विलास मुंढरे, संजय नन्नावरे डाटा एन्ट्री कम्प्युटर

शुभेच्छुक -
६६ व्या वंदनिय राष्ट्रसंतांच्या तपोभुमीतील गुंफा यात्रा महोत्सवाच्या तसेच गणराज्य दिनाच्या खासदार डॉ.नामदेवरावजी कीरसान यांचे तर्फे गुरुदेव भक्त भाविक व जनतेला हार्दिक शुभेच्छा
डॉ. विजय गावंडे
अध्यक्ष चिमूर तालुका कॉंग्रेस कमिटी

# नाशिकमध्ये भाजपचे दोन उमेदवार भिडले



## पत्नीसह आलेल्या उमेदवारावर हल्ला

■ **नाशिक :** नाशिकमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असताना गोंधळ बघायला मिळाला. देवानंद बिरारी त्यांच्या पत्नीसह जेव्हा अर्जाच्या संदर्भात विभागीय कार्यालयात आले तेव्हा एका उमेदवाराने त्यांच्यावर हल्ला केल्याची घटना घडली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे इथे पोलिसांची तसेच यंत्रणांची तारांबळ उडल्याचे पाहायला मिळाले. नाशिकमध्ये पुन्हा एकदा दोन भाजपच्या उमेदवारांमध्ये संघर्ष पाहायला मिळाला आहे.

नाशिकच्या प्रभाग 31 ड येथील दोन उमेदवारांमध्ये संघर्ष झाल्याचे समजते. भाजपचे उमेदवार बाळकृष्ण शिरसाट व देवानंद बिरारी यांच्यात संघर्ष झाला. तसेच देवानंद बिरारी यांच्या पत्नी यांनी बाळकृष्ण शिरसाट यांना कोणीही मतदान करू नये, असे प्रसार माध्यमांसमोर येत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. तर दुसरीकडे बाळकृष्ण शिरसाट यांनी आमच्यात कोणताही वाद झालेला नसल्याचे म्हटले आहे. या सगळ्या गोंधळानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत उमेदवारांना बाहेर काढल्याचे पाहायला मिळाले. नाशिकच्या सिडको विभागीय कार्यालयाच्या परिसरात काही काळासाठी गोंधळ निर्माण झाला होता. उमेदवारी अर्ज दाखल करत असताना देवानंद बिरारी आणि त्यांच्या पत्नीवर अचानक हल्ला करण्यात आल्याचा दावा बिरारी यांनी केला आहे. तर असा कोणताही वाद झाला नसल्याचे बाळकृष्ण शिरसाट यांनी म्हटले आहे. एकंदरीतच नाशिकमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या नाट्यमय घटना गेल्या काही दिवसांत पाहायला मिळाल्या आहेत. नाशिकमधील महापालिकेची निवडणूक चांगलीच चुरशीची होणार असल्याचा अंदाज यावरून आपण लाऊ शकतो.

# कृषी विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाण्यांचे उन्नतीकरण करावे

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची सूचना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** जागतिक हवामानाचे गंभीर संकट लक्षात घेऊन राज्यातील कृषी विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाणांना संस्कारित करून त्यांचे उन्नतीकरण करावे. प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल अशा प्रकारचे बियाणे निर्माण करावीत असे सांगताना कृषी विद्यापीठांनी राज्यात नैसर्गिक शेतीची क्रांती आणण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल तथा राज्यातील विद्यापीठांचे कुलपती आचार्य देवव्रत यांनी केले. लोकभवन मुंबई येथून कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील कृषी व पशुविज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरूंशी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधताना राज्यपाल बोलत होते.

बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, पोकराचे प्रकल्प संचालक परिमल सिंह, राज्यातील कृषी तसेच पशुविज्ञान विद्यापीठांचे कुलगुरु, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, 'आत्मा'चे संचालक सुनील बोरकर व कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संकरीत बियाणे शेतकऱ्यांसाठी संकट असून ते महाग देखील आहे. त्यांचा वापर



केल्यास रासायनिक खते देखील जास्त लागतात. उत्पादित अन्नधान्याला चव नसते व त्याचे पोषणमूल्य देखील कमी असते. त्यामुळे कृषी विद्यापीठांनी पारंपरिक बियाण्यांवर संशोधन करुन त्याचे उन्नतीकरण करावे, असे राज्यपालांनी सांगितले.

सर्व कृषी विज्ञान केंद्रांनी नैसर्गिक शेतीच्या प्रचार प्रसारासाठी 'मॉडेल फार्म' विकसित करावे व शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी असे राज्यपालांनी सांगितले. नैसर्गिक शेती ही लोकचळवळ झाली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

नैसर्गिक शेती हे पवित्र असे ईश्वरी कार्य आहे. भावी पिढ्यांच्या अन्नसुरक्षेसाठी जमिनीचा पोत सुधारायचा असेल तर नैसर्गिक शेतीशिवाय गत्यंतर नाही. बरेचदा शेतकरी थेट दुकानदारांकडे जाऊन दुकानदार सांगतील त्या प्रमाणात युरिया, डीएपी, कीटकनाशके खरेदी करतात व शेतात वापरतात. त्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे. या दृष्टीने विद्यापीठांनी शेतकऱ्यांचे प्रबोधन करावे असेही राज्यपालांनी सांगितले.

गुजरात मधील चार कृषी विद्यापीठे गेल्या तीन वर्षांपासून नैसर्गिक शेती या विषयावर संशोधन करीत आहे. त्यामुळे राज्यातील विद्यापीठांनी त्या विषयावर नव्याने संशोधन सुरु न करता गुजरातमधील संशोधन पुढे न्यावे. त्यांनी तयार केलेल्या संशोधन पत्रिका व पुस्तके राज्यातील विद्यापीठांना उपलब्ध करून देऊ असे राज्यपालांनी सांगितले.

आपण अलीकडे गावागावांमध्ये जाऊन लोकांमध्ये नैसर्गिक शेतीबाबत जनजागृती करीत आहोत, असे राज्यपालांनी सांगितले. अशाच एका भेटीमध्ये आणंद जिल्ह्यात २५ गावांमध्ये आज भूमिगत जलस्त्रोतांमध्ये नायट्रेट आढळून आले असून पाणी पिण्यायोग्य राहिले नाही, ही गोष्ट निदर्शनास आली. दूषित पाण्यांमुळे लोकांना गंभीर आजार होत आहेत. या दृष्टीने रसायनांच्या वापराबाबत जागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्याकडे एक गाय असली तरी देखील शेती करता येते हे त्यांना पटवून द्यावे लागेल. महाराष्ट्रात साहिवाल, थारपारकर, कांकरेज, गीर आदी देशी गायींचे संवर्धन केले गेल्यास ते शेतीला वरदान ठरेल व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल असेही राज्यपालांनी सांगितले. यावेळी 'आत्मा'चे संचालक सुनील बोरकर यांनी सादरीकरण केले. आपण महाराष्ट्रात नैसर्गिक शेती विषयावर घेतलेल्या दोन परिसंवादानंतर कृषी विभाग व विद्यापीठांनी हे कार्य सकारात्मक पद्धतीने हाती घेतले याबद्दल राज्यपालांनी समाधान व्यक्त केले.

# मतदानाआधीच मनसेचे उमेदवार गायब

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत अहिल्यानगरमध्ये अचानक असा स्फोटक वळण लागलं, की अवघ्या राजकीय वर्तुळाची झोप उडाली. मतदानाआधीच उमेदवारच गायब! हा प्रकार थेट लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा आहे की राजकीय डावपेचांचा भाग–यावर आता वादळ उठलं आहे.

यांच्या नेतृत्वाखालील (मनसे) चे दोन उमेदवार अर्जमाघारीच्या पहिल्याच दिवशी बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आणि शहरात पळवापळवी की किडनॅप? अशी कुजबुज सुरू झाली. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ६८ जागांसाठी निवडणूक जाहीर होताच पक्षांनी बंडखोरी रोखण्यासाठी गोपनीयतेचा कडेकोट ठेवला होता. मात्र, हीच रणनीती आता उलटी ठरतेय का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील मनसेचे उमेदवार राहुल जाधव आणि अंबरनाथ भालसिंग कालपासून नॉट रिचेबल आहेत.

मनसे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांनी थेट आरोप करत राजकीय तापमान आणखी वाढवलं. आमच्या उमेदवारांवर दबाव टाकला जात आहे. ते अचानक गायब झालेत. कुटुंब भयभीत आहे. हे केवळ योगायोग नाही, असा दावा त्यांनी केला. गायब उमेदवारांपैकी एकाची थेट लढत च्या उमेदवाराशी, तर दुसऱ्याची च्या उमेदवाराशी होणार होती. त्यामुळे संशयाची सुई थेट राजकीय साठमारीकडे वळली आहे.

# राहुल नार्वेकरांकडून कायदे धाब्यावर बसवत लोकशाहीचा खून

## हर्षवर्धन सपकाळांचे राज्य निवडणूक आयोगाला पत्र



■ **मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईत मोठा वाद निर्माण झाला आहे. अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी कुलाबा परिसरात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरू दिले नाहीत, असा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. यावरून आता कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना पत्राद्वारे राहुल नार्वेकर यांच्यावर आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रात म्हटले की, राज्यात महानगरपालिकांच्या निवडणुका सुरु असून आदर्श आचारसंहिता लागू आहे. लोकशाहीमध्ये निवडणूका निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भिड वातावरणात पार पाडणे हे आपल्या आयोगाचे कर्तव्यच आहे. परंतु या निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर हरप्रकारे दबाव आणून अर्ज मागे घेण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. यात सर्वात महत्वाचे म्हणजे विधानसभेचे विद्यमान अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल करुन घेऊ नये यासाठी प्रशासनावर दबाव आणला, विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले हे अत्यंत गंभीर आहे. राहुल नार्वेकर हे संवैधानिक पदावर आहेत, त्यांच्याकडून अशापद्धतीने कायदा धाब्यावर बसवून दडपशाहीचा मार्ग अवलंबणे लोकशाहीचा खून करण्यासारखे कृत्य आहे.

# मुंबईसाठी ठाकरेंचा जाहीरनामा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २ :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आता अवघे 15 दिवस शिल्लक असताना राजकीय हालचालींना वेग आला आहे. दादर येथील शिवसेना भवनात आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी संयुक्तपणे महानगरपालिका उमेदवारांसमोर एक महत्त्वाचे प्रेझेंटेशन सादर केले, ज्यामध्ये सत्ता आल्यास मुंबईच्या विकासासाठी नेमके काय करायचे, याबाबतचा सविस्तर आराखडा मांडण्यात आला. हे प्रेझेंटेशन आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याकडे अंतिम मंजुरीसाठी सादर केले जाणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सुधारणा करून लवकरच मुंबईकरांसाठीचा अधिकृत 'वचननामा' जाहीर केला जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

महापलिकेच्या मालकीची जमीन खासगी



विकासकांच्या घशात न घालता तिथे मुंबईकरांची सोय करणाऱ्या शासकीय, महापालिका, बेस्ट आणि पोलिस कर्मचाऱ्यांना तसेच गिरणी कामगारांना हक्काची घरे देणार. तसेच मुंबई महापालिकेचे स्वतःचे गृहनिर्माण प्राधिकरण असेल. इतकेच नव्हे तर पुढील 5 वर्षात 1 लाख मुंबईकरांना परवडणारी घरे दिली जातील, अशी आश्वासने आदित्य ठाकरे तसेच अमित ठाकरे यांनी दिली आहेत. शिवसेना आणि मनसे यांच्या वचननाम्यात मुंबईकरांसाठी काय आहे, हे सविस्तर पाहूया.

# बाबासाहेबांच्या फोटोची विटंबना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** भाजप शासित मध्य प्रदेशात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोची विटंबना करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करत बाबासाहेबांच्या फोटोंचे दहन करणे हे सरळ - सरळ राष्ट्रविरोधी कृत्य असल्याचा आरोप केला आहे.

मध्य प्रदेशातील ग्वालियर येथे वकील आशुतोष दुबे व त्यांच्या काही कार्यकर्त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे दहन करण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट शहरात वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर शहरात मोठा तणाव निर्माण झाला. पोलिसांनी वेळीच कारवाई करत स्थिती नियंत्रणात आणली. पण कथित समाजकंटकांनी तोपर्यंत बाबासाहेबांचा फोटो जाळून टाकला होता. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यात आरोपी बाबासाहेबांचा फोटो जाळताना दिसून येत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी या प्रकरणी तीव्र रोष व्यक्त केला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे फोटो जाळणे हे उघडपणे राष्ट्रविरोधी कृत्य आहे. अशा राष्ट्रविरोधी वर्तनातून सामाजिक, आर्थिक व राजकीय बदलांची भीती स्पष्टपणे दिसून येते.

# वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवा अखंड क्षमापित पत्राचे वितरण



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :** आरोग्यसेवा आयुक्तालय मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात राज्यातील 195 वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'सेवाखंड कालावधीत क्षमापित पत्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. गेली 20 वर्ष प्रलंबित असलेल्या या प्रश्नाची सोडवणूक केल्याबद्दल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोग्यमंत्री आबिटकर यांचे आभार मानले. यावेळी डॉक्टरांनी लोकांना अधिक चांगली आरोग्यसेवा देण्याची जबाबदारी पार पाडावी. चांगले काम करावे. तुमच्या हक्काच्या गोष्टी देण्याबाबत शासन सकारात्मक असल्याचे मंत्री आबिटकर म्हणाले.

नुकतेच 150 डॉक्टरांना 'सेवा खंड कालावधी क्षमापित' केले होते. एकूण 345 डॉक्टरांना पत्र देण्यात आले असून, उर्वरित सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना येत्या महिन्याभरात क्षमापण पत्राचे वितरण करण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी यावेळी सांगितले. या ऐतिहासिक निर्णयामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांना अनेक प्रकारचे लाभ मिळू शकणार आहेत. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल वैद्यकीय अधिकाऱ्यांकडुन समाधान व्यक्त होत आहे.

आरोग्य विभागात 2009 पूर्वी अस्थायी स्वरूपात अनेक वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते. 2009 मध्ये या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा शासकीय सेवेत समावेश झाला आहे. मात्र ह्यसेवाखंड कालावधी क्षमापित नसल्याने त्यांना इतर लाभापासून वंचित राहावे लागत होते. वैद्यकीय अधिकारी यांचे संघटनेकडून याबाबत वारंवार मागणी होत होती. त्या अनुषंगाने आरोग्यमंत्र्यांनी पारदर्शकपणे सर्व पात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवाखंड क्षमापित करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक वैद्यकीय अधिकाऱ्यांची सलग सेवा ग्राह्य धरण्यात येणार असून त्यामुळे इतर आर्थिक व प्रशासकीय लाभ त्यांना मिळतील.

आरोग्यव्यवस्थेत समर्पित सेवा देण्याचा निश्चय करूया, या निर्णयामुळे आरोग्य सेवेत गुणात्मक वाढ होईल. नक्षलग्रस्त आदिवासी व डोंगरी भागात कार्यरत असणाऱ्या वैद्यकीय सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेतनसह विशेष इन्सेटिव्ह देण्यासाठी देखील वित्त विभागास प्रस्ताव पाठवला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र उपजिल्हा रुग्णालय जिल्हा रुग्णालयात महात्मा फुले जन आरोग्य योजना सुरु झाली असुन उपचारासाठी मान्य असलेल्या आजारांची संख्या वाढवून 2399 करण्यात आली आहे.

# धुळे महानगरपालिकेत भाजपाचा विजय



■ **महासागर प्रतिनिधी, धुळे, दि. २ :** धुळे महापालिकेच्या ७४ नगरसेवक जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत भाजपाला महत्त्वाचे प्रारंभिक यश मिळताना दिसत आहे. निवडणुकीचा निकाल लागण्याआधीच भाजपाच्या चार नगरसेवकांची बिनविरोध निवड निश्चित झालेली आहे, तर प्रभाग क्रमांक १७ अ मध्ये अमोल मासुळे यांचा बिनविरोध विजय झाला आहे.

भाजपाने यंदा धुळे महानगरपालिकेत ६३ उमेदवारांना तिकीट दिले आहे. निवडणुकीपूर्वी विरोधकांनी अनेक बंडखोरांना हाताशी घेत त्यांना उमेदवारी दिली होती; मात्र भाजपाच्या हिंदुत्व आणि देशहिताच्या भूमिकेच्या प्रभावामुळे अनेकांनी माघार घेतली आहे. प्रभाग क्रमांक १७ अ मध्ये, शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार आणि अपक्ष उमेदवार माघार घेतल्यामुळे अमोल मासुळे यांचा मार्ग मोकळा झाला. शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार थेट भाजपात सामील झाला आहे.भाजपच्या या बिनविरोध पद्धतीवर विरोधकांकडून प्रश्न उठवले जात आहेत. शिवसेनेच्या उमेदवार पार्वती जोगी यांनी आरोप केला की भाजप नेते आणि स्थानिक प्रतिनिधी दबाव टाकून विरोधकांना माघार घ्यायला लावत आहेत. विरोधकांनुसार, ही पद्धत लोकशाही विरोधी असून लोकशाहीची हत्या आहे.

याबाबत मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, नाराज झालेल्या भाजपा महिला जिल्हाध्यक्षांना विरोधकांकडून उमेदवारी देण्यात आली असली तरी, राजकारण फक्त आमिष दाखवून टिकत नाही. त्यांनी खुल्या आणि लोकशाही पद्धतीने निवडणूक लढवण्याचे आवाहन केले.

# ई-केवायसी न करणाऱ्या लाडक्या बहिणींना मोठा फटका



■ **मुंबई :** राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाकांक्षी ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक केले होते. राज्यातील २ कोटी ४७ लाख महिलांपैकी १ कोटी ८० लाख महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्याचे महिला व बाल विकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. त्यामुळे ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्याने ६७ लाख महिला लाभापासून मुकणार आहेत. नवीन वर्षापासून जानेवारीपासून त्यांच्या बँक खात्यात नोव्हेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता जमा होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

# तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २ :** पुण्यातील हडपसर भागातील फुरसुंगी येथे दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी एका पादचारी तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सायंकाळी घडली. या घटनेनंतर हल्लेखोर पसार झाले असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

आकाश कृष्णा चाबुकस्वार (वय २१, रा. फुरसुंगी, हडपसर-सासवड रस्ता) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी दुचाकीवरील हल्लेखोरासह त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आल्याची माहिती फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश चाबुकस्वार गुरुवारी सायंकाळी फुरसुंगी परिसरातून जात असताना दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्याला अडवले. त्यांच्यात वाद झाल्यानंतर आरोपींनी आकाशला मारहाण केली आणि त्याच्या डोक्यात दगड घालून ते भरधाव वेगाने पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या आकाशला नागरिकांनी तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, हल्लेखोरांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

# डॉ.शिवचरण उज्जैनकर यांचं कार्य साहित्यिक व गुणवंतांना ऊर्जा देणार

## डी.बी. जगतपुरीया यांनी काढले फाउंडेशनच्या कार्याविषयी गौरव उदगार

■ **वृत्तसंस्था, मुक्ताईनगर, दि. २ :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचा 16 वा वर्धापन दिन नुकताच माळी मंगल भवन,मुक्ताईनगर जिल्हा जळगाव या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला. या सोहळ्याचे अध्यक्ष एरंडोल जिल्हा जळगाव येथील कवी लेखक प्रा.वा.ना. आंधळे तर उद्घाटक बाल भारतीचे निवृत्त सहसचिव तथा उज्जैनकर फाउंडेशनचे बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख खामगाव येथील पांडुरंग दैवज्ञ व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यातील विविध जिल्ह्यातील 75 मान्यवर पुरस्कारार्थींना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व गुलाब बुके देऊन तापी पूर्णा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तसेच दुपारच्या तालुकास्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात मुक्ताईनगर तालुक्यातील 75 गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, गुलाब पुष्प आणि स्वामी विवेकानंदांचे पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला या सोहळ्याचे अध्यक्ष शिक्षक नेते तथा जळगाव जिल्हा माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पत पेढीचे माजी अध्यक्ष एस.डी.भिरुड तथा या सत्राचे उद्घाटक म्हणून




लाभलेले ख्यातनाम कवी, लेखक, पत्रकार तथा उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य सल्लागार छत्रपती संभाजी नगर येथील सुप्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार तथा उज्जैनकर फाउंडेशनचे राज्य सल्लागार डी.बी. जगतपुरिया उपाध्यक्ष खामगाव येथील विनोदभाऊ डिडवानिया फाउंडेशनचे राज्य नियोजन समितीचे अध्यक्ष अकोला येथील डॉ.अशोक शिरसाट फाउंडेशनचे राज्य सचिव छत्रपती संभाजी नगर येथील ॲड. सर्जेराव साळवे विदर्भ विभागीय अध्यक्ष हिवरा आश्रम जिल्हा बुलढाणा येथील प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके सर राज्य सल्लागार अकोला येथील तुळशीराम बोबडे शिवलिंग काटेकर फाउंडेशनच्या अकोला जिल्हा कार्याध्यक्ष प्राथमिक डॉ.कल्पना गोरले बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार बुलढाणा जिल्हा समन्वयक खामगाव येथील बाळूभाऊ ईटणारे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष खामगाव येथील शंकरराव अनासुने खामगाव येथील प्रा.डॉ.दीपक नागरिक पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष पुणे येथील रामचंद्र गुरव पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव बार्शी जिल्हा सोलापूर येथील कवी अशोक मोहिते नाशिक जिल्हा अध्यक्ष प्रा. डॉ.प्रशांत रणसूरे उत्तर महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष जळगाव येथील ज्योती राणे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव मुक्तईनगर येथील गणेश कोळी आदी मान्यवर व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी ख्यातनाम कवी,पत्रकार छत्रपती संभाजीनगर येथील डी.बी. जगतपुरिया म्हणाले की, डॉ.शिवचरण उज्जैनकर हे चार भिंतीमध्ये अध्यापन करणारे शिक्षक नाही. कवी श्रेष्ठ श्री.दि.इनामदार यांच्या काव्यप्रमाणे...

सोन्यालाही सुगंध लाभे ज्ञानाला चांदणे
माझी शाळा पहा बांधते विद्येला तोरणे

तर डॉ.शिवचरण उज्जैनकर हे शाळेला विद्येचे तोरण बांधून शिक्षक व समाजसेवक, विद्यार्थी आणि गुणवंतांना अफाट ऊर्जा देणारे ध्येय धुंद अध्यापक आहेत. हा आजचा इयत्ता दहावी व बारावीच्या तालुकास्तरीय गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा त्याचेच मूर्तीमंत उदाहरण आहे मित्रहो, डॉ.उज्जैनकर हे राज्यस्तरीय आणि अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन आयोजित करून नवागतांना नवदितांना प्रेरणा देतात. ज्येष्ठांचा सन्मान करतात.

शिवा सरांचे संपूर्ण कुटुंबीय समाजसेवा करणारे आदर्श कुटुंब आहे त्यांच्या अर्धांगिनी संगीता या त्यांच्यामागे ठामपणे उभ्या आहेत शिवा सरांचे वडील मधुकरराव व आई अनुसया यांचा त्यांना अखंड शुभाशीर्वादाचे मजबूत कवच लाभलेले आहे. तर मुलं सचिन, अरविंद आणि दिपाली हे सुद्धा त्यांना नेहमीच साथ देत असतात आज मूल्यांचा ऱ्हास होऊन ढासळलेल्या अवस्थेत प्रत्येक शाळेतून सांस्कृतिक कार्य व सामाजिक कार्य चेतावणाऱ्या उजार्वान श्री शिवा सरांची गरज आहे आणि संधी साधू साहित्यिकांना उज्जैनकर फाउंडेशन कडून गौरवण्यात येऊ नये असे सुद्धा मला वाटते असेही परखड मत श्री जगतपुरीया यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की,

सूर्य उगवला उठा उठा रे प्रकाशा दे हा का
आयुष्याच्या तेज पथावर पाय पुढे टाका

देशपथावर जाऊन एक एक पाऊल पुढे जात आहे. मी याचा 2008 पासूनचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे हा मोत्यासारखे माणसं टिकवणारा मातब्बर आहे. मी सन्मानित होणाऱ्या सर्व मुक्ताईनगर तालुक्यातील इयत्ता दहावी आणि बारावीतील असंख्य गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो आज उपस्थित असणाऱ्या गुणवंतांच्या गळ्यात यशाची माळ नेहमी पडत राहो हीच सदिच्छा व्यक्त करतो. या प्रसंगी कवी डी.बी. जगतपुरीया यांनी फाउंडेशनच्या कार्याविषयी गौरव उदगार काढले आणि उपस्थित सर्व पुरस्कारार्थी विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून दाद दिली.

याप्रसंगी डॉ.शिवचरण उज्जैनकर यांचे वडील मधुकर, आई अनुसयाबाई तसेच डॉ.उज्जैनकर व संगीता उज्जैनकर यांचा मान्यवरांनी शाल, स्मृतिचिन्ह, गुलाब बुके देऊन सत्कार केला हा भव्य सोहळा यशस्वीतेसाठी फाउंडेशनच्या कार्यकारणी खजिनदार संगीता उज्जैनकर फाउंडेशनचे कार्यकारिणी सचिव प्रमोद पिवटे सदस्य प्रा. विनायक वाडेकर आजीव सभासद तथा उज्जैनकर यांचे जावई दीपक शेठ बुडूखले व कन्या दिपाली बुडूखले तथा डॉ.उज्जैनकर यांचे चिरंजीव अरविंद उज्जैनकर यांचे साड भाऊ मलकापूर येथील सुनील मुंधोकार व लता मुंधोकार योगेश सोनार भावेश सोनार व उज्जैनकर सर यांचे कुटुंबीय आणि फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुषार भारतीयांकडून सचिन भेंडे विरोधातील याचिका मागे

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.2 )** – स्थानिक प्रभाग क्रमांक 19 साईनगरच्या ड-सीटवर निवडणूक रिंगणात उतरलेल्या सचिन भेंडे यांच्या नामांकनाविरोधात दाखल करण्यात आलेली याचिका तुषार भारतीय यांनी मागे घेतली आहे. भेंडे यांच्या नामांकनास वैध ठरविणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्यांच्या निर्णयाला आव्हान देत तुषार भारतीय यांनी नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र आता त्यांनी ही याचिका स्वत:हून मागे घेतल्याने



भेंडे यांचे नामांकन पूर्णत: वैध ठरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या घडामोडीनंतर प्रभाग क्रमांक 19 च्या ड-सीटवरील निवडणूक लढत आणखी रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, सचिन भेंडे हे युवा स्वाभिमान पार्टीकडून अधिकृत उमेदवार असून तुषार भारतीय यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली आहे. ही जागा 'हाय-प्रोफाइल' म्हणून ओळखली जात आहे. नामांकनावरील वाद संपुष्टात आल्याने आता या दोन्ही बलाढ्य दावेदारांमध्ये थेट व काट्याची लढत पाहायला मिळणार आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, अमरावती महानगरपालिका निवडणुकीतील ही जागा सर्वाधिक चर्चेत राहणाऱ्या आणि निकालाच्या दृष्टीने निर्णायक ठरणाऱ्या प्रभागांपैकी एक ठरू शकते.

# 161 जणांची माघार; 661 उमेदवार रिंगणात

### आज चिन्हांचे वाटप, प्रचाराला वेग ■ महापालिका निवडणूकीत रंगत



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.2 )**– शहरातील नवव्या सार्वत्रिक महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी माघारीची प्रक्रिया पूर्ण होताच राजकीय चित्र स्पष्ट झाले आहे. अर्ज छाननी व माघारीनंतर तब्बल 161 उमेदवारांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतली असून आता सातही झोनमधून एकूण 661 उमेदवार निवडणूक लढविण्यास सज्ज झाले आहेत. शनिवारी (दि.3) उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप होणार असून त्यानंतर प्रचाराचा खऱ्या अर्थाने पडदा वर जाणार आहे.

माघारीच्या पहिल्या दिवशी केवळ 11 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले होते. मात्र अंतिम दिवशी मोठी धावपळ पाहायला मिळाली. शुक्रवारी एकाच दिवशी 150 उमेदवारांनी माघार घेतल्याने राजकीय समीकरणे बदलली. झोननिहाय पाहता झोन क्रमांक 2 मध्ये सर्वाधिक 27 उमेदवारांनी माघार घेतली, तर झोन क्रमांक 6 मध्ये केवळ 11 उमेदवारांनी माघार घेतली.

### तिरंगी व चौकोनी लढती

निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार आज उमेदवारांना चिन्हांचे वाटप केले जाणार आहे. चिन्ह मिळताच सर्वच पक्षांचे उमेदवार प्रचारात अधिक जोमाने उतरतील. प्रमुख राजकीय पक्षांनी प्रचाराची रणनिती आखली असून अपक्ष उमेदवारही मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी कंबर कसत आहेत. अनेक प्रभागांत बलाढ्य उमेदवार आमनेसामने असल्याने तिरंगी व चौकोनी लढती रंगणार आहेत. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, नागरी सुविधा आणि स्थानिक विकासकामे हेच प्रचाराचे मुख्य मुद्दे ठरणार असून ही निवडणूक चुरशीची ठरेल, अशी चिन्हे दिसत आहेत.

| झोन | गुरुवार | शुक्रवार | अर्जमागे | वैधरित्या संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 18 | 19 | 97 |
| 2 | 1 | 27 | 28 | 100 |
| 3 | 1 | 25 | 26 | 94 |
| 4 | 2 | 21 | 23 | 108 |
| 5 | 2 | 26 | 28 | 83 |
| 6 | 3 | 11 | 14 | 53 |
| 7 | 1 | 22 | 23 | 126 |
| एकूण | 11 | 150 | 161 | 661 |

### प्रभाग 7 मधून सर्वाधिक उमेदवार

उमेदवारांच्या संख्येनुसार झोन क्रमांक 7 सर्वाधिक गजबजलेला ठरला असून येथे 126 उमेदवार रिंगणात आहेत. झोन क्रमांक 4 मध्ये 108, झोन क्रमांक 2 मध्ये 100, झोन क्रमांक 1 मध्ये 97, झोन क्रमांक 3 मध्ये 94, झोन क्रमांक 5 मध्ये 83, तर झोन क्रमांक 6 मध्ये सर्वात कमी 53 उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

### प्रभाग क्र. 1 शेगांव-रहाटगांव : 8 दावेदारांनी माघार घेतली

प्रभाग क्र. 1 शेगांव- रहाटगांव येथील अ-सीटवरून प्रिया वानखडे, ब-सीटवरून अभिषेक बोले, गोपाळ धर्माले, सुनील केणे, आशीष कावरे, क-सीटवरून प्रेमा लव्हाळे तसेच ड-सीटवरून राहुल साबळे व दिनेश धाकडे यांनी आपली नामांकनपत्रे मागे घेतली आहेत.

### प्रभाग क्र. 2 संत गाडगेबाबाङ्क्पीडीएमसी : केवळ 4 नामांकनांची माघार

प्रभाग क्र. 2 संत गाडगेबाबाङ्क्पीडीएमसी येथून केवळ चार दावेदारांनी नामांकन मागे घेतले आहे. अ-सीटवरून विजय आठवले, नरेंद्र गुलदेवकर, क-सीटवरून प्रमिला जाधव तसेच ड-सीटवरून संजय कडू यांचा त्यात समावेश आहे. त्यामुळे या प्रभागातील चारही जागांवर सध्या अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळत आहे.

### प्रभाग क्र. 3 नवसारी : 9 नामांकनांची माघार

प्रभाग क्र. 3 नवसारी येथील अ-सीटवरून वंदना शंकर मांडवे, ब-सीटवरून शैलेश अमृते, विनोद ऊर्फ श्याम पाध्ये, विशाल डहाके, क-सीटवरून योगिता बोंडे, पूजा अटालकर, सारिका कुलकर्णी, स्वाती जावरे तसेच ड-सीटवरून आनंद दरणे यांनी आज आपली नामांकनपत्रे मागे घेतली.

### प्रभाग क्र. 4 जमील कॉलनी-लालखडी : 9 दावेदारांनी माघार

मुस्लीम बहुल असलेल्या प्रभाग क्र. 4 जमील कॉलनीङ्क्लालखडी येथे अ-सीटवरून रिजवाना बानो आरिफ पटेल, ब-सीटवरून फरजाना परवीन, हाजरा सुलताना, क-सीटवरून शाजिया तरन्नुम, जेहरून्निस्सा शकील, शगुफ्ता परवीन तसेच ड-सीटवरील उमेदवारांनी आपली नामांकनपत्रे मागे घेतली आहेत.

### प्रभाग क्र. 5 महेंद्र कॉलनी-नवा कॉटन मार्केट : 6 दावेदारांची माघार

प्रभाग क्र. 5 महेंद्र कॉलनीङ्क्नवा कॉटन मार्केट येथून केवळ सहा दावेदारांनी नामांकन मागे घेतले आहे. अ-सीटवरून रवि गायगोले व संजय भोवते, ब-सीटवरून मेघा काळे व वैशाली पावडे, तर क-सीटवरून आयेशा खानम आसिफ खान व वनिता जाधव यांनी माघार घेतली आहे. मात्र या प्रभागातील ड-सीटवरून कोणत्याही उमेदवाराने नामांकन मागे घेतलेले नाही.

### प्रभाग क्र. 7 जवाहर स्टेडियम : 10 नामांकनांची माघार

प्रभाग क्र. 7 जवाहर स्टेडियम येथून एकूण दहा दावेदारांनी आज नामांकन मागे घेतले. अ-सीटवरून रेखा यादव, भारती पारोचे, अनिता रायबोले, क-सीटवरून कोमल आहुजा, शीतल वाघमारे, मोनिका उमक तसेच ड-सीटवरून संजय अग्रवाल, आत्माराम पुरसवानी, वैभव बजाज व दाऊद गफ्फार शेख यांचा त्यात समावेश आहे.

## श्याम बाबा मंदिराच्या जागेवरून वाद

### ■ नातेवाईकांकडून शिवीगाळ व धमकी ■ फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 2 )** – शहरातील श्यामनगर येथील ऐतिहासिक श्याम बाबा मंदिराच्या देखभाल व मालकीच्या मुद्द्यावरून नातेवाईकांनी शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना 1 जानेवारी रोजी दुपारी घडली. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी ईश्वरदास शंकरलाल रामावत (वय 60, रा. श्यामनगर, अमरावती) हे कुटुंबासह राहत असून मंदिरात पूजापाठ करतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर जागेवर सुमारे 74-75 वर्षांपूर्वी श्याम बाबा मंदिराची स्थापना करण्यात आली असून, याची देखभाल पूर्वी त्यांच्या वडिलांकडून व नंतर गेल्या 16 वर्षांपासून स्वत: फिर्यादी करीत आहेत. मंदिराच्या देखभालीसाठी भाविकांकडून मिळणाऱ्या देणगीतून खर्च भागविला जातो. मात्र, फिर्यादीचे आतेभाऊ अजय मदनलाल रामावत व त्यांचे पुतणे प्रदीप विजयकुमार रामावत (रा. मालू ले-आऊट, गडगडेश्वर मंदिराजवळ, अमरावती) हे वारंवार मंदिरात व घरी येऊन मंदिराच्या जागेवर आमचा हक्क आहे असे म्हणत वाद घालत असल्याचा आरोप आहे. मंदिराच्या खुल्या जागेवर ताबा देण्याची मागणी करत ते शिवीगाळ व मारहाणीच्या धमक्या देत होते. 1 जानेवारी रोजी दुपारी सुमारे 1.45 वाजता हे दोघे मंदिराजवळ आले असता, भाविकांच्या उपस्थितीत फिर्यादी व त्यांच्या आईस अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देऊन निघून गेले, या घटनेमुळे फिर्यादी व त्यांच्या आईला धोका निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

### जिल्ह्यात लोकशाही दिन रद्द

**अमरावती** – महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे अमरावती जिल्ह्यातील लोकशाही दिनाचे आयोजन रद्द करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात होणारा लोकशाही दिन यावेळी होणार नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी 19 जानेवारीपर्यंत महापालिका निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू राहणार आहे. या कालावधीत कोणतेही प्रशासकीय कार्यक्रम, लोकशाही दिन अथवा नागरिकांच्या तक्रारींचे सार्वजनिक मंचावर आयोजन करण्यास मर्यादा असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. आचारसंहिता कालावधी संपल्यानंतर लोकशाही दिनाचे आयोजन पुन्हा सुरू करण्यात येईल, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## जन्मठेपेच्या कैद्याकडून पेनड्राइव्ह जप्त

### अमरावती मध्यवर्ती कारागृहात सुरक्षा भंग

महासागर | प्रतिनिधी



**अमरावती, ( दि. 2 )** अमरावती मध्यवर्ती कारागृहातील सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हत्येच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याकडून महत्त्वाचे सरकारी दस्तऐवज व सीसीटीव्ही फुटेज असलेली पेनड्राइव्ह जप्त झाल्याने खळबळ उडाली आहे. पेनड्राइव्ह जप्त करण्यात कैदीचे नाव सागर उर्फ मुकेश विठ्ठल बारब्दे आहे.

हत्येच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैदी सागर उर्फ मुकेश विठ्ठल बारब्दे याच्याकडून जप्त या पेनड्राइव्हमध्ये महत्त्वाचे सरकारी पत्रव्यवहार तसेच कारागृहाच्या सुरक्षेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज साठवलेले असल्याचे उघड झाले आहे.

सागर उर्फ मुकेश विठ्ठल बारब्दे (वय 31, रा. वरूर, जौलका, ता. अकोट, जि. अकोला) हा अमरावती मध्यवर्ती कारागृहात हत्येच्या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. त्याला 30 दिवसांची संचित रजा मंजूर झाल्यानंतर 13 डिसेंबर रोजी रजेवर सोडण्यात येणार होते. त्या दिवशी त्याला त्याच्या सामानासह कारागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणण्यात आले.

सामानाची कसून तपासणी सुरू असताना, कापडी पिशवीच्या वरच्या भागात लपवून ठेवलेली एक पेनड्राइव्ह आढळून आली. संशयावरून तपासणी केल्यानंतर या पेनड्राइव्हमध्ये विभागीय कार्यालयाच्या संगणकावरून मिळवलेले महत्त्वाचे सरकारी पत्रव्यवहार तसेच कारागृहाच्या सुरक्षेसाठी अत्यंत गोपनीय मानले जाणारे सीसीटीव्ही फुटेज असल्याचे निदर्शनास आले. कारागृहातील सुरक्षा व्यवस्था बिघडवण्याच्या उद्देशाने हा संवेदनशील डेटा हस्तगत केल्याचा आरोप करत तुरुंग कर्मचारी योगेश हरिनारायण जानोरकर (वय 36) यांनी फ्रेझरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यावरून फ्रेझरपुरा पोलिसांनी कैदी सागर बर्बडे याच्याविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू केला आहे. या प्रकारामुळे कारागृहातील अंतर्गत सुरक्षा, माहिती संरक्षण आणि कर्मचारी व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, या प्रकरणात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## ओव्हरटेकच्या प्रयत्नात ट्रकची दुचाकीला धडक

### ■ युवक ठार, मित्र गंभीर जखमी

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.2 )** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात सायंकाळच्या सुमारास नांदगाव पेठ हद्दीतील सिटी लँड व्यावसायिक संकुला समोरील फ्लायओव्हरवर घडला. मंगेश शरद केदारे (वय 35, रा. दापोरी, ता. मोर्शी) असे मृताचे नाव आहे.



या अपघातात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला आहे. दोघेही अमरावतीहून दुचाकीने आपल्या मूळ गावी दापोरीकडे जात होते.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, फ्लायओव्हरवर समोरून जाणाऱ्या बसला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न सुरू असताना मागून वेगात येणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की मंगेश केदारे गंभीर जखमी होऊन रस्त्यावर फेकले गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर निखिल याला देखील गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत करत जखमी निखिल याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या प्रकरणी संबंधित ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## सुनील वऱ्हाडे यांचा भाजपमध्ये प्रवेश

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.2 )** – जिल्हा परिषद व सहकार क्षेत्रातील प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष सुनील वर्हाडे यांनी आज सुमारे 2 हजार कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर हा प्रवेश झाल्याचे बोलल्या जात आहे.

नागपूर मार्गावरील मणिरत्न रिसॉर्ट येथे आज दुपारी आयोजित भव्य कार्यक्रमात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सुनील वर्हाडे व त्यांच्या शेकडो समर्थकांचे भाजपमध्ये स्वागत करण्यात आले. सुनील वर्हाडे यांनी जिल्हा परिषदेत विविध पदांवर काम केले असून सहकार क्षेत्रातही त्यांचा मोठा अनुभव आहे. ते राज्य शासनाचे दिवंगत मंत्री अनिल वर्हाडे यांचे धाकटे बंधू आहेत.



तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते दोन ते तीन कार्यकाळ संचालक राहिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी कार्यकाळ पूर्ण केला असून वलगाव परिसरात त्यांचा मजबूत जनाधार आहे. आगामी जिल्हा परिषद निवडणूक ते भाजपच्या उमेदवार म्हणून लढण्याची दाट शक्यता असून त्यांच्या प्रवेशामुळे स्थानिक राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# राणांसमोर झुकली भाजप

### युवा स्वाभिमानच्या तीन उमेदवारांसाठी भाजपचे तीन उमेदवार मैदानातून बसविले

### ■ स्वाभिमानच्या तिन्ही उमेदवारांना भाजपचे लिखित समर्थन ■ भाजपाच्या इतिहासातील अभूतपूर्व राजकीय घडामोड

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.2 ) – 15 जानेवारी रोजी होणाऱ्या अमरावती महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिवशी शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. भारतीय जनता पार्टीने आमदार रवि राणा यांच्या युवा स्वाभिमान पार्टीसाठी तीन जागांवर आपल्या उमेदवारांना निवडणुकीतून बसविण्याचा निर्णय घेतला.**




युवा स्वाभिमानच्या उमेदवारांसाठी भाजपने एबी फॉर्म दिलेले व नामांकन दाखल केलेले स्वत:चे उमेदवार मागे घेत लिखित समर्थन जाहीर केले. शहराच्या राजकीय इतिहासात पहिल्यांदाच एखादा राष्ट्रीय पक्ष असतानाही राणांच्या युवा स्वाभिमानसाठी झुकत असल्याचे पहायला मिळत आहे.

या निवडणूक रणनीतीसंदर्भात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे खास अमरावतीत दाखल झाले होते. युवा स्वाभिमानचे अध्यक्ष आमदार रवि राणा यांनी त्यांचे जंगी स्वागत करत सखोल चर्चा केली. या चर्चेनंतर युवा स्वाभिमानच्या पाच कार्यर्त्यांसाठी भाजपकडून समर्थन निश्चित झाले. या घडामोडींमुळे महापालिका निवडणुकीची राजकीय समीकरणे बदलल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार रवि राणा आणि युवा स्वाभिमानच्या नेत्यांमध्ये झालेल्या दीर्घ चर्चेनंतर भाजपने तीन ठिकाणी आपल्या उमेदवारांना मागे घेत युवा स्वाभिमानच्या उमेदवारांना समर्थन जाहीर केले.

### असे आहेत बसविलेले उमेदवार

- **प्रभाग 11 ( रूक्मिणी नगर-फ्रेजरपुरा )**– येथे भाजपचे उमेदवार शैलेश राऊत यांना बसवून युवा स्वाभिमानचे सूरज भारत चौधरी यांना समर्थन देण्यात आले.
- **प्रभाग 17 ( गडगडेश्वर )**– येथे क सीटवरील भाजपच्या महिला उमेदवार मृणाल चौधरी यांच्या जागी युवा स्वाभिमानच्या प्रियांका भूषण पाटणे यांना समर्थन जाहीर झाले.
- **प्रभाग 21 ( जुनी बस्ती )**– येथे भाजपचे गौरव बांते यांना मागे घेऊन युवा स्वाभिमानचे किरण वसंतराव आंबाडकर यांना समर्थन देण्यात आले. या सर्व बदलांना भाजपने अधिकृत पत्राद्वारे मान्यता दिली असून, या निर्णयामुळे अमरावतीतील निवडणूक रणांगणात नवे राजकीय वारे वाहू लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

## भाजप नेत्यांनी नशेत वाटल्या तिकीट!

### आमदार संजय कुटेसह भाजपच्या इतर पदाधिकाऱ्यांविरोधात निदर्शने

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.2 )**– महानगरपालिकेच्या निवडणुकीत उमेदवारी वाटपावरून भारतीय जनता पार्टीत मोठा असंतोष उफाळून आला आहे. भाजपाचे माजी मंत्री तथा जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे हे अमरावती शहराचे निरीक्षक असून, त्यांनी दारूच्या नशेत उमेदवारी वाटप केल्याचा गंभीर आरोप नाराज कार्यकर्त्यांनी केला आहे. संजय कुटे यांच्यासह अमरावती शहरातील निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या भाजपाच्या सर्व पदाधिकाऱ्यांविरोधात कार्यकर्त्यांनी तीव्र रोष व्यक्त केला.



उमेदवारी न मिळाल्यामुळे कार्यकर्ते आक्रमक झाले असून, पक्षाशी दीर्घकाळ एकनिष्ठ राहिलेल्या कार्यकर्त्यांना डावलून अलीकडेच पक्षात दाखल झालेल्यांना उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप आहे. दोन दिवसांपूर्वी राजापेठ येथील महापालिकेच्या झोन कार्यालयात भाजपाचे पदाधिकारी दिनेश सूर्यवंशी, शिवराय कुलकर्णी व जयंत डेहनकर यांना कार्यकर्त्यांच्या संतापाला सामोरे जावे लागले. शिवराय कुलकर्णी यांनी श्री काली माता मंदिर संस्थानचे शक्ती महाराज यांचा अवमान केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आज राजकमल चौकात भाजपाच्या नाराज कार्यकर्त्यांनी जोरदार निषेध आंदोलन केले. आक्रमक वातावरणामुळे अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना आपला नियोजित दौरा बदलावा लागला. ते सकाळी श्री अंबादेवी मंदिरात दर्शनासाठी येणार होते; मात्र आंदोलनाची शक्यता लक्षात घेता त्यांनी मंदिरात जाणे टाळले. विशेष म्हणजे, पालकमंत्री अमरावतीत दाखल होऊन थेट खासदार रवी राणा यांची भेट घेऊन अकोल्याकडे रवाना झाले.

दरम्यान, श्रद्धा गहलोत यांनी माध्यमांशी बोलताना आरोप केला की, पदाधिकाऱ्यांनी आपल्या घरच्या लोकांना उमेदवारी दिली, तर प्रामाणिक कार्यकर्त्यांना डावलले. पैशांच्या व्यवहारातून उमेदवारी देण्यात आल्यानेच शिवसेनेसह युती न झाल्याचा आरोपही त्यांनी केला. श्री काली माता देवस्थानचे शक्ती महाराज यांनी भाजपाच्या पदाधिकाऱ्यांवर गर्व व घमंडाचा आरोप करत, या निवडणुकीत जनता भाजपाला धडा शिकवेल, असा इशारा दिला.

# सावित्रीबाई फुले, भारतीय समाज क्रांतीच्या योद्धा

महाराष्ट्राच्या पुनर्जागरणाने आधुनिक भारतीय पुनर्जागरणाच्या सुधारणेत हिंदू धर्म, सामाजिक व्यवस्था आणि परंपरांना आव्हान दिले. वर्ण-जातीव्यवस्था मोडून काढण्यासाठी आणि स्त्रियांवरील पुरुषी वर्चस्व संपवण्यासाठी संघर्ष केला. शूद्र आणि स्त्रियांनी महाराष्ट्राच्या पुनर्जागरणाचे नेतृत्व केले. या पुनर्जागरणाचे दोन स्तंभ होते - सावित्रीबाई फुले आणि त्यांचे पती ज्योतिराव फुले.

------------------

हिंदू धर्म, सामाजिक व्यवस्था आणि परंपरेत शूद्र आणि स्त्रियांना समान मानले जात नव्हते. हिंदू धर्मशास्त्रही म्हणते की - स्त्रिया आणि शूद्रांनी शिक्षण घेऊ नये. या प्रस्थापित समजुती होत्या आणि सर्व जातीचे लोक त्यांचे पालन करीत होते. आधुनिक भारतात हिंदू धर्म, सामाजिक व्यवस्था आणि परंपरेत शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रियांना दिलेल्या गौण स्थानाला प्रथम पद्धतशीरपणे आव्हान देणारी स्त्री म्हणजे सावित्रीबाई फुले. त्यांनी आयुष्यभर शूद्र आणि अतिशूद्रांच्या मुक्तीसाठी आणि स्त्रियांच्या मुक्तीसाठी लढा दिला.

त्यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव नावाच्या गावात झाला. हे महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यात आहे, जे पुण्याजवळ आहे. वर्णव्यवस्थेनुसार शूद्र जातीत जन्मलेल्या खंडोजी नेवसे पाटील यांच्या त्या ज्येष्ठ कन्या होत्या. ती जन्माने शूद्र आणि स्त्री अशा दोन्ही गोष्टी होती, त्यामुळे तिच्या पालकांना वाटले की ती दोन्हीची शिक्षा घेऊन जन्मली आहे. ज्या काळात शूद्र जातीतील मुलालाही शिक्षण घेणे निषिद्ध होते, त्या काळात शूद्र जातीत जन्मलेल्या मुलीला शिक्षण मिळण्याचा प्रश्नच नव्हता.

ती घरकाम करायची आणि वडिलांच्या शेतीच्या कामात मदत करायची. गावच्या इतर लोकांसोबत शिरवळच्या बाजारात गेली तेव्हा तिने पहिले पुस्तक पाहिले. तिने काही परदेशी पुरुष आणि स्त्रिया झाडाखाली येशू ख्रिस्ताची प्रार्थना करताना पाहिल्या. कुतूहलाने ती तिथे थांबली कारण त्यातील एका पुरुष आणि स्त्रीने तिच्या हातात एक पुस्तिका ठेवली.

सावित्रीबाई पुस्तिका घेण्यास संकोच करत होत्या. देणाऱ्याने सांगितले, जरी तुम्हाला वाचता येत नसले तरी ही पुस्तिका घ्या. त्यात छापलेली चित्रे पहा. सावित्रीबाईंनी ती पुस्तिका सोबत आणली. वयाच्या ९ व्या वर्षी तिचे लग्न १३ वर्षांच्या ज्योतिराव फुले यांच्याशी झाले आणि जेव्हा ती आपल्या घरातून ज्योतिराव फुलेंच्या घरी गेली, तेव्हा ती आपल्यासोबत ती पुस्तिका घेऊन आली.

ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, त्यांचे जीवनसाथी असण्याबरोबरच त्यांचे गुरुही बनले. सावित्रीबाई फुले यांनी ज्योतिराव फुले आणि सगुणाबाई यांच्या देखरेखीखाली प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर अहमदनगरमध्ये औपचारिक शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी पुण्यातील शिक्षक प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण घेतले.

त्यांच्यासोबत फातिमा शेख यांनीही या प्रशिक्षण शाळेत शिक्षक प्रशिक्षण घेतले. इथेच त्या जवळच्या मैत्रिणी झाल्या. फातिमा शेख या ज्योतिराव फुले यांचे जवळचे मित्र आणि सहकारी उस्मान शेख यांच्या बहिणी होत्या. नंतर त्या दोघींनी एकत्र अध्यापनाचे काम केले.

फुले दाम्पत्याने १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा उघडली. १५ मे १८४८ रोजी जेव्हा ज्योतिराव फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे शाळा उघडली, तेव्हा सावित्रीबाई फुले मुख्याध्यापिका झाल्या.

या शाळांचे दरवाजे सर्व जाती आणि धर्माच्या लोकांसाठी खुले होते. ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी उघडलेल्या शाळांची संख्या वाढत होती. चार वर्षांत त्यांची संख्या १८ पर्यंत पोहोचली.

फुले दाम्पत्याची ही पावले ब्राह्मणवादाला थेट आव्हान होती. ते त्यांच्या एकाधिकाराला आव्हान देत होते, जे समाजावरील त्यांच्या वर्चस्वावर



**विकास परसराम मेश्राम**
**मु+पो. झरपडा, ता. अर्जूनी/मोर, जि. गोंदिया.**
**7875592800**

कारवाई करत होते. ज्योतिराव फुले यांचे वडील गोविंदराव यांच्यावर पुरोहितांनी प्रचंड दबाव आणला. गोविंदराव पुरोहित आणि समाजासमोर कमकुवत झाले. त्यांनी ज्योतिराव फुले यांना सांगितले की एकतर आपल्या पत्नीसोबत शाळेत शिकवणे बंद करा किंवा घरी जा.

इतिहास घडवणाऱ्या नायकाप्रमाणे, दुःखी आणि जड मनाने, ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रियांच्या मुक्तीसाठी घर सोडण्याचा निर्णय घेतला.

कुटुंबातून बहिष्कृत झाल्यानंतर ब्राह्मणी शक्तींनी सावित्रीबाई फुले यांचा छळ सुरू ठेवला आणि त्यांच्या मार्गात अनेक अडथळे आणले.

सावित्रीबाई फुले जेव्हा शाळेत शिकवायला जायच्या, तेव्हा गावकरी त्यांच्यावर दगड आणि शेण फेकत असत. सावित्रीबाई थांबत आणि नम्रपणे म्हणत, 'भाऊ, मी तुमच्या बहिणींना शिकवून चांगले काम करत आहे. तुम्ही फेकलेले दगड आणि शेण मला थांबवू शकत नाहीत, उलट ते मला प्रेरणा देतात. फुलांचा वर्षाव होतोय असे वाटते.

मी दृढनिश्चयाने माझ्या बहिणींची सेवा करत राहीन. मी प्रार्थना करेन की देव तुम्हाला आशीर्वाद देईल." शाळेत गेल्यावर ती साडी बदलायची. शिक्षणासोबतच फुले दाम्पत्याने समाजातील इतर समस्यांवरही लक्ष केंद्रित करायला सुरुवात केली.

सर्वात वाईट स्थिती विधवांची होती. त्यांपैकी बहुतेक उच्च जातीच्या होत्या. त्यांपैकी बहुतेक ब्राह्मण कुटुंबातील होत्या. बऱ्याचदा या विधवा एकतर गरोदर असताना आत्महत्या करतात किंवा त्यांनी जन्म दिलेल्या मुलाला सोडून देतात. १८६३ मध्ये फुले कुटुंबाने बालहत्या रोखण्यासाठी घर सुरू केले. कोणतीही विधवा येथे येऊन तिच्या मुलाला जन्म देऊ शकते. त्याचे नाव रोखून ठेवण्यात आले.

या बालहत्या प्रतिबंधक गृहाचे पोस्टर अनेक ठिकाणी लावण्यात आले. या पोस्टरवर लिहिले होते, 'विधवा! येथे अनामिकपणे रहा आणि कोणत्याही समस्येशिवाय तुमच्या बाळाला जन्म द्या. तुमचे बाळ तुमच्यासोबत घ्या किंवा येथे ठेवा, हे तुमच्या इच्छेवर अवलंबून आहे."

सावित्रीबाई फुले यांनी स्वतः बालहत्या प्रतिबंधक गृहात आलेल्या स्त्रिया आणि तेथे जन्मलेल्या मुलांची काळजी घेतली. त्याचप्रमाणे फुले दाम्पत्याने काशीबाई या ब्राह्मण विधवेच्या मुलाचे स्वतःचे म्हणून संगोपन केले. ज्याचे नाव यशवंत होते.

ज्योतिराव फुले यांनी १८७३ मध्ये सामाजिक बदलासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्व सावित्रीबाई फुले यांच्याकडे सोपवण्यात आले. त्यांनी १८९१ ते १८९७ पर्यंत त्याचे नेतृत्व केले. सत्यशोधक विवाह पद्धतीच्या अंमलबजावणीतही त्यांची महत्त्वाची भूमिका होती.

सावित्रीबाई फुले या आधुनिक मराठी कवयित्री होत्या. त्यांचा पहिला काव्यसंग्रह, काव्य फुले, १८५४ मध्ये प्रकाशित झाला, जेव्हा त्या २३ वर्षांच्या होत्या. १८९२ मध्ये त्यांचा दुसरा काव्यसंग्रह 'बावन काशी सुबोध रत्नाकर' प्रकाशित झाला. हा बावन्न कवितांचा संग्रह आहे. त्यांनी हे लेखन ज्योतिराव फुले यांच्या स्मरणार्थ समर्पित केले आहे.

सावित्रीबाई फुले यांची भाषणेही १८९२ मध्ये प्रकाशित झाली. याशिवाय त्यांनी लिहिलेली पत्रेही अत्यंत महत्त्वाची आहेत. ही पत्रे परिस्थिती, लोकांची मानसिकता, सावित्रीबाईंचा विचार आणि फुले यांचे विचार समोर आणतात.

१८९६ मध्ये पुणे आणि त्याच्या आजूबाजूच्या भागात पुन्हा दुष्काळ पडला. सावित्रीबाई फुले यांनी दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी रात्रंदिवस काम केले. त्यांनी सरकारवर दुष्काळग्रस्तांना मोठ्या प्रमाणात मदत सामग्री पुरवण्यासाठी दबाव आणला.

शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रियांसाठी शिक्षिका आणि मार्गदर्शक असलेल्या माता सावित्रीबाईंनी आयुष्यभर अन्यायाशी सतत लढत न्याय प्रस्थापित केला. समाजसेवा करताना त्यांचा मृत्यू झाला.

१८९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ पसरली. तिला लोकांना बरे करण्यात आणि त्यांची सेवा करण्यात आनंद होता. ती स्वतः या रोगाला बळी पडली. १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे कार्य आणि विचार मशालप्रमाणे राष्ट्राला मार्गदर्शन करत आहेत.

# चिकाटीच्या दहा हजार धावा

## स्मृती मानधनाचा प्रेरणादायी प्रवास!



भारतीय महिला क्रिकेटने एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे, कारण स्मृती मानधनाने अलीकडेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०,००० धावा पूर्ण केल्या आहेत आणि महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये ती चौथ्या स्थानावर पोहोचली आहे. ही कामगिरी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नाही; ती सातत्य, दृढनिश्चय आणि जागतिक स्तरावर भारतीय महिला क्रिकेटची वाढती प्रतिष्ठा दर्शवते.

अत्यंत लहान वयात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून, स्मृती जगातील सर्वात सुंदर आणि विश्वासार्ह फलंदाजांपैकी एक म्हणून विकसित झाली आहे. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० या तिन्ही फॉरमॅटमधील तिच्या धावा तिचे तांत्रिक कौशल्य, जुळवून घेण्याची क्षमता आणि मानसिक सामर्थ्य अधोरेखित करतात. तिच्या आकर्षक फटकेबाजीसाठी आणि दबावाखाली कामगिरी करण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाणारी, ती अनेक वर्षांपासून भारताच्या फलंदाजीची एक आधारस्तंभ राहिली आहे.

१०,००० धावांचा टप्पा पार केल्यामुळे स्मृती जागतिक क्रिकेटमधील एलिट खेळाडूंमध्ये सामील झाली आहे. हा टप्पा गाठणाऱ्या सर्वात वेगवान महिला क्रिकेटपटूंपैकी ती एक आहे, जे तिचे उल्लेखनीय सातत्य दर्शवते.

**प्रा. विजय कोष्टी**
**कवठेमहांकाळ जि. सांगली.**

पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या खेळात, तिच्या कामगिरीने लोकांच्या धारणा बदलण्यास आणि महिला खेळाडूंना अधिक ओळख मिळवून देण्यास मदत केली आहे.

स्मृती मानधनाचा प्रवास खूप प्रेरणादायी आहे, विशेषतः भारतातील तरुण मुलींसाठी. आव्हाने, दुखापती, टीका आणि अपेक्षांना सामोरे जाऊनही, ती लक्ष केंद्रित करून आणि खंबीर राहिली आहे. शिस्त, कठोर परिश्रम, कुटुंबाचा पाठिंबा आणि आत्मविश्वास हे तिच्या यशाचे आधारस्तंभ आहेत.

आज, स्मृती केवळ एक क्रिकेटपटू नाही, तर ती तरुण महिलांसाठी एक आदर्श आहे, जी आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा आणि चिकाटीचे प्रतीक आहे. तिचे यश एक शक्तिशाली संदेश देतेः समर्पण आणि दृढनिश्चयाने कोणतेही अडथळे पार केले जाऊ शकतात.

१०,००० आंतरराष्ट्रीय धावांपर्यंत पोहोचणे हा शेवट नाही, तर स्मृती मानधनाच्या शानदार कारकिर्दीतील एक नवीन अध्याय आहे.

ती नवनवीन विक्रम रचत असताना, ती एका पिढीला मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि उच्च ध्येये ठेवण्यासाठी प्रेरित करते. स्मृती मानधनाचे मनःपूर्वक अभिनंदन!

■ ■ ■

## अर्वाचिन मराठी काव्याच्या जनक ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची काव्यसंपदा

भारतातील आद्य मुख्याध्यापिका, आद्य शिक्षिका, समाजसुधारक म्हणून सावित्रीबाई फुले यांचे कार्य प्रेरणादायी आहे. उपेक्षित स्त्रियांचे शिक्षण व स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार आणि अनिष्ठ रुढींच्या विरोधात अखंड संघर्ष करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाला.

**प्रा. श्रीकृष्ण बनसोड**
**किशोर नगर, अमरावती.**

महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे जनक, दलितांचे उध्दारक व सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा जोतीराव फुले यांचे सोबत सावित्रीबाईंचा १८४० साली विवाह झाला. ते मिशनऱ्यांच्या शाळेत इंग्रजी शिकले होते. शिक्षणामुळे झालेल्या जागृतीने समाजातील तीव्र विषमतेचे प्रखर भान येऊन, त्यांनी आपले जीवन तळागाळातील जनतेचे शैक्षणिक परिवर्तन व त्यांचा सामाजिक पातळीवर उध्दार करण्यासाठी खर्ची घालायचे ठरविले.

सावित्रीबाईंनी जोतीरावांच्या बरोबरीने समाजसेवेचा वसा घेतला. मुलींनी शिकावे म्हणून त्यांनी शाळा सुरु केल्या. त्यांनी सामाजिक क्रांतीचे कार्य हे जाणिवपूर्वक अंगिकारले होते. जोतीरावांच्या शिक्षण कार्यात सहकार्य करण्यासाठी सावित्रीबाई प्रथम स्वतः शिकल्या. अध्यापनाचे धडे घेतले. स्त्री शिक्षणाचे कार्य त्यांनी चांगल्याप्रकारे आणि ध्येयाने खुपच पुढे नेले.

सावित्रीबाईंनी समाज प्रबोधनपर व समाज जागृतीसाठी व सामान्यांना समजेल अश्या भाषेत गद्य, पद्य,पत्रे , भाषणे आणि गाणे इत्यादिंच्या माध्यमातून विचार मांडले. त्यांचा पहिला काव्यसंग्रह काव्यफुले हा सन १८५४ मध्ये प्रकाशित झाला. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत मनोगत व्यक्त करतांना त्या लिहतात.

*अर्पित फुले ही तुम्हा सुगंधी साची ।*
*काव्यात ओवते माळ करुनिया त्यांची ॥*
*आहेत मजेची काव्यफुले ती सारी ।*
*वासाने तयांच्या शांति मिळे अंतरी॥*

शिक्षणानेच माणसाला माणुस बनता येते. त्यामुळे चांगले-वाईट यातील फरक समजतो. माणूस विचारी होतो. स्वतःचे दुःख निवारणार्थ उपाय योजतो. अंधश्रध्दा हा समाजाला लागलेला शाप आहे म्हणून त्यांनी त्या विरुध्द आपल्या कवितेतून प्रबोधन केले.

शिक्षणानेच मानवी मनातील द्वेष, तिरस्कार, हिंसाचार, संकुचित वृत्ती नष्ट होवून तो मानवतेचा पुजारी व्हावा हा विचार त्यांनी कवितेतून मांडला.

*शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा।*
*शिक्षणाने मनुष्यत्व येते पशुत्व हटते पहा॥*

असे त्या म्हणतात. विद्येची देवता म्हणून सरस्वतीला प्रत्येकाच्या मनात सनातन्यांनी कोंबले पण सरस्वतीने किती शाळा सुरु केल्या. किती शूद्र मुलींना शिकविले. किती विधवांचा उध्दार केला? उलट सावित्रीबाई यांनी शुद्र-अतिशुद्र मुली, ब्राम्हण विधवा यांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या हक्कासाठी संपुर्ण जीवन खर्ची घातले.

मनुष्याचा खरा दागिना शिक्षण आहे त्यानेच युगायुगाच्या गुलामगिरीतुन मुक्तता होवू शकते. त्यांनी मानवाची व्याख्या कवितेतुन करतांना म्हटले की,

*ज्ञान नाही विद्या नाही।*
*ते घेणेची गोडी नाही।*
*बुध्दी असून चालत नाही।*
*तयास मानव म्हणावे का?॥*

अर्वाचिन मराठी साहित्यात कवि केशवसुत यांना आधुनिक कवितेचे जनक म्हणुन संबोधिले जाते पण सावित्रीबाई फुले यांचे काव्य हे केशवसुतांच्या काव्याच्या ३०-३५ वर्ष आधी रचलेले काव्य आहे. तेव्हा अर्वाचिन मराठी साहित्यात केशवसुतांनी कवितेच्या माध्यमातुन क्रांति केल्याचे जे म्हटले जाते त्याची पुर्वतयारी सावित्रीबाईंच्या कवितांनी केली.

केशवसुतांनी काव्य प्रांतात केलेली क्रांति ही एक उत्क्रांतीची अवस्था होय. केशवसुतांचे काव्य ही अर्वाचिन मराठी काव्यातील एक प्रगल्भ अवस्था तर सावित्रीबाई फुले ह्या अर्वाचिन मराठी काव्याच्या जनक होत.

सावित्रीबाईंच्या काव्यफुले आणि बावनकशी सुबोध रत्नाकर ह्या पुस्तकावर समिक्षा होण्याची गरज आहे. त्यामुळे सावित्रीबाईंचे कवयित्री म्हणून करण्यात आलेली उपेक्षा आणि त्यांच्या वाङ्‌मयीनदृष्ट्या समृध्द असलेल्या कवितांची ओळख होवु शकेल आणि त्या कवितांना ऐतिहासिक महत्व असल्याची जाणीवही सर्वांना होवु शकेल.

# फासावर लटकवायला हवे...

उन्नाव बलात्कार प्रकरणी सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिल्यानंतर पीडित महिला व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.कारण सेंगरच्या जामिन अर्जावर स्थगिती आल्याने सध्याच्या परिस्थितीत त्यांच्या पळवाटांवर अंकुश लागला आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की राजकीय पुढाऱ्यांच्या अशा घृणास्पद केसचा निकाल कासवाच्या गतीने का चालतो किंवा का लांबविल्या जातो हा मोठा गहन प्रश्न आहे.

सर्वसामान्यांच्या केसमध्ये सरकार व कायदा तडकाफडकी निर्णय घेतो आणि निर्णय लावतो ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.परंतु आपण ज्याला लोकप्रतिनिधी, आमदार म्हणतो असे माजी आमदार कुलदीप सेंगर यांच्या बलात्कार केस प्रकरणाला तब्बल आठ वर्षे पूर्ण झालीत म्हणजे तब्बल २९२० दिवस तरीही पीडितेला अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही.

उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत सेंगर फासावर लटकला असता. सर्वांनाच कल्पना आहे की सेंगर दोषी आहे. परंतु सरकारने जर जातीने पुढाकार घेतला असता तर सेंगरला केंव्हाच फाशी झाली असती हेही तितकेच सत्य आहे. परंतु सरकार सुध्दा सेंगरला वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

सरकारने हेही लक्षात ठेवले पाहिजे की, एका बलात्कारी सेंगरला जर ताबडतोब फाशी झाली तर देशातील राजकीय वतुर्ळात भुकंप येईल व बलात्कार प्रकरणावर अंकुश लागेल हेही तितकेच सत्य आहे.

राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात.तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले. परंतु आताही उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी यांच्यावर अजून पर्यंत कठोर शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.

देशातील कोणतेही बलात्कार प्रकरण असो अशा केसेसचा निकाल फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालायला पाहिजे व यात ताबडतोब फाशीच्या शिक्षेचे प्रावधान असणे गरजेचे आहे.

कारण कुलदीप सेंगर सारखे असे हजारो राजकीय पुढारी आहेत की आपल्या सत्तेचा,संपत्तीचा आणि अधिकाराचा गैरवापर करून घृणास्पद कृत्य करीत असतात.

२०१७ च्या उन्नाव बलात्कार प्रकरणात मोठा निर्णय घेतांना सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली हायकोर्टाच्या त्या आदेशाला स्थगिती दिली, ज्यामध्ये अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणी दोषी आणि भाजपमधून हकालपट्टी करण्यात आलेले कुलदीप सेंगर यांची जन्मठेपेची शिक्षा स्थगित करण्यात आली होती.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणारा नराधम कुलदीप सेंगर याच्या केसचा ताबडतोब निर्णय लावून फाशीच्या शिक्षेचीच मागणी मुख्यत्वे करून सरकारकडून व इतर संपूर्ण राजकीय स्तरातून व्हायला पाहिजे.

आता सरकारने वेळ न घालवता उन्नाव बलात्कार प्रकरणातील ठोस पुरावे पहाता पीडीतेला न्याय देण्याच्या उद्देशाने सामोर येण्याची गरज आहे जेणेकरून नराधम बलात्कारी कुलदीप सेंगर याला लवकरात लवकर फाशीची सजा होईल.कारण कुलदीप सेंगरच्या या घृणास्पद कृत्य पहाता सर्वच स्तरातून फाशीच्या शिक्षेची मागणी होत आहे.

त्यामुळे सन्माननीय सर्वोच्च न्यायालय यांना माझी नम्र विनंती आहे की उन्नाव बलात्कार प्रकरणाचा निकाल लवकरात लवकर लावून नराधम सेंगरला फासावर लटकविला पाहिजे. तेव्हाच पीडीतेला योग्य न्याय मिळेल व लोकशाहीला नवी दिशा मिळेल.

## वाचक लिहितात

### 'कौडिंण्य ' गौरवशाली इतिहासाचे प्रतीक

'लुक ईस्ट अँक्ट ईस्ट' ही संकल्पना या लाकडी शिडाच्या जहाजाच्या माध्यमातून साकार झाली आहे. भारतीय नौसेना आणि भारतीय संस्कृती मंत्रालय यांच्या एकत्रित सहभागाने या जहाजाची निर्मिती झाली आहे यामध्ये आयआयटी मद्रास मधील वैज्ञानिकांचाही मोठा सहभाग आहे. हे जहाज म्हणजे भारतीय प्राचीन गौरवशाली इतिहासाचे प्रतीक आहे. याच्या निर्मितीसाठी लाकडाची तावदाने, नारळाच्या झाडापासून बनवलेले दोरखंड आणि राळ, कापूस आणि माशाचे तेल यापासून तयार केलेला डिंक या केवळ तीन गोष्टीच वापरल्या आहेत. याच्या बांधणीत केरळ मधील पारंपारिक करागिरांचा मोठा सहभाग आहे.

याची लांबी १९.६ मीटर आणि रुंदी ६.५ मीटर आहे. यावर सूर्य म्हणजे सौर ऊर्जेचे प्रतीकआणि शक्तीचे प्रतीक म्हणून 'याली' या दोन मुखे असलेल्या प्राण्याचे चित्र रेखाटले आहे. महाराष्ट्रातील अजिंठा येथील दगडी शिल्पात साकारलेल्या जहाजाच्या प्रतीकृतीवरुन या जहाज बांधणीची कल्पना मूर्त स्वरूपात आली. 'कौडिंण्य' या नावातही मोठाअर्थ सामावलेला आहे.

कौडिंण्य या नाविकाने व्यापारच्या निमित्ताने भारतीय संस्कृती कंबोडियापर्यंत पोहोचवली. पाश्चिमात्त्यांनी भारतीयांना नौकानयन शिकवले हा प्रचलित समज पूर्णपणे असत्य आहे हे यामुळे सिद्ध होते. पूर्वी भारतीय व्यापारी ज्या समुद्र मार्गाने मसाल्याचा व्यापार करत होते त्याच मार्गाने हे शिडाचे जहाज गुजरात येथील पोरबंदर पासून ओमानची राजधानी मस्कत येथे जाणार आहे. कोणत्याही आधुनिक उपकरणाशिवाय या जहाजा मार्गे होणारा प्रवास हे एक मोठे आव्हान आहे हे आव्हान १५ जणांच्या चमुने स्वीकारले आहे. या प्रवासासाठी त्यांना खास प्रशिक्षण देण्यात आले आहे.

समुद्राच्या उत्तुंग लाटा आणि सतत बदलणारी वाऱ्याची दिशा या अडथळ्यांवर मात करून कोणत्याही आधुनिक उपकरणाशिवाय हा प्रवास म्हणजे एक मोठे आव्हान आहे. या लाकडी जहाजाची निर्मिती बघून चीन आणि अमेरिकेने तोंडात बोटे घातली आहेत. कौडिंण्यचा प्रवास म्हणजे 'आत्मनिर्भर' भारत या दिशेने टाकलेले एक दमदार पाऊल आहे.


**श्रीमती संध्या काटदरे, माणगाव, रायगड.**

### साम दाम दंड भेद

नागपूर आणि अन्य महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. तिकीट मिळाले नसल्याने बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांवर नेत्यांनी वेगवेगळ्या पद्धतीने दबाब आणून अर्ज मागे घेण्यास बाध्य केले. अनेकांनी पक्षाच्या मोठ्या नेत्यांचे ऐकले असले तरी अनेक बंडखोर मैदानात असून, त्यांना धोका असल्याचे ते सांगतात. राजकारणात सर्व काही क्षम्य असते, हेच यातून सिद्ध होते.

■ **दिगांबर शेळके, नागपूर.**

# किडनीच्या विकाराने त्रस्त आहात?



किडनीची समस्या नेहमीच हळूहळू सुरु होते. सुरुवातीला याची लक्षण दिसत नाहीत. अशावेळी लोक सप्लीमेंट्सचा विचार करतात. जे किडनीचे कार्य चांगले होण्यासाठी मदत करेल, सूज कमी करेल आणि किडनीला आरोग्यदायी करेल.

मात्र कोणताही सप्लीमेंट्स किडनीचा आजार ठीक करु शकत नाही. योग्य पद्धतीने आणि योग्य प्रमाणात घेतलेले काही पोषक तत्वे ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेसला कमी करणे आणि किडनीच्या कायार्ला मदत करु शकतात. NIH आणि नॅशनल किडनी फाऊंडेशन संबंधी झालेल्या अभ्यासही तेच सांगत आहे.

**व्हिटामिन्स ठरु शकते उपयोगी**

टारगेटेड न्यूट्रिशनच्या ताकदीचा विचार करायचा झाला तर काही खास व्हिटामिन्स आणि एंटीऑक्सीडेंट सेल्सला होणारे नुकसान कमी करणे, डिटॉक्स प्रक्रियेसा सपोर्ट करणे आणि किडनीचे टिश्यूला पडणाऱ्या ताणापासून वाचवण्यास सहायक ठरु शकतात.

या उपचाराचा पर्याय नाही. परंतू मेडीकल ट्रीटमेंटच्या सोबत हा सपोर्ट सिस्टीम सारखी काम करु शकते. व्हिटामिन्स सी ला एक मजबूत एंटीऑक्सिडेंट मानले जाते. हे किडनीच्या टीश्यूत होणारी सूज आणि ऑक्सीडेटिव्ह डॅमेजला कमी करण्यास मदत करु शकते, जे दीर्घकाळापर्यंत किडनीच्या कार्यक्षमतेला नुकसान पोहचवू शकतात. सुरक्षित प्रमाणात घेतलेले व्हिटामिन्स सी किडनीला मजबूत बनवण्यासाठी सहाय्यक होऊ शकते.

हे इम्युन सिस्टीमला सपोर्ट करते. वारंवार होणाऱ्या इन्फेक्शन उदा. युटीआय किडनीच्या समस्येला आणि बिघडवू शकते. व्हिटामिन्स सी शरीराच्या रोग प्रतिकारक क्षमतेला मजबूत करते. ज्यामुळे इन्फेक्शनचा धोका कमी होऊ शकतो आणि किडनीवर होणारा अतिरिक्त दबाव देखील घटू शकतो.

किडनी सातत्याने शरीरातील टॉक्सिन्सला फिल्टर करत रहात असते. त्यामुळे फ्री रेडिकल्सपासून होणारे नुकसान येथे लवकर होऊ शकते. व्हिटामिन्स सी या हानिकारक तत्वांना समाप्त करण्यास मदत करते. ज्यामुळे किडनीवर ऑक्सीडेटीव्ह स्ट्रेस कमी होतो. आणि हळूहळू होणाऱ्या हानीचा वेग धीमा होऊ शकतो.

**या स्थितीत जपावे**

किडनी स्टोनच्या प्रकरणातही व्हिटामिन्स सीची भूमिका थोडी संतुलन असणारी आहे. काही लोकांमध्ये मर्यादित प्रमाणात याचे सेवन युरिनमद्ये स्टोन तयार करणाऱ्या तत्वांना कमी करु शकते. परंतू खूप जास्त प्रमाणात व्हिटामिन्स सी घेतल्याने उलट स्टोनचा धोका वाढू शकतो. यामुळे डोस घेतना सावधानता बाळगायला हवी. खास करुन ज्या लोकांमध्ये एडव्हान्स किडनी डिसिज आहे किंवा ज्यांच्या ऑक्सेलट स्टोन तयार होण्याची प्रवृत्ती आहे. त्यांना व्हिटामिन्स सीच्या हाय डोस पासून सावधी रहायला हवे.

कोणत्याही प्रकारचे सप्लीमेंट सुरु करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा आहे. खास करुन किडनी संबंधी औषधे घेताना ही काळजी घ्यायला हवी आहे. ■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### मी सावित्री बोलतेय..

**हे सखिंनो**
**स्त्री मुक्तिच्या प्रणेत्या म्हणून**
**तुम्ही मला गौरवान्वित**
**करीत आहात हे मी जाणते..**

**परंतु माझ्या स्वप्नातील स्त्री**
**अद्याप मुक्त झालेली नाही**
**हे शल्य मी तुम्हाला सांगते..**

**मी शिक्षणाचे द्वार खुले केले**
**ही तर स्त्री मुक्तिच्या दिशेने**
**पहिली पायरी होती..**

**अशा अनेक पायऱ्या**
**अद्याप बाकी आहेत!**
**बाकी आहेत..!**

# दीक्षा जोशी म्हणते, टेलिव्हिजनने मला शिकवले....

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई , दि. २:

गुजराती चित्रपटांत आपले स्थान निर्माण केल्यावर जयेशभाई जोरदार, कौशलजीज ५२ कौशल आणि धडक 2 सारख्या बॉलीवूड चित्रपटांमध्ये आपली उपस्थिती नोंदवणारी दीक्षा जोशी छोट्या पडद्यावर सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मन जिंकत आहे.



टेलिव्हिजनवर काम करण्याचा आपला अनुभव शेअर करताना दीक्षाने सांगितले हे माध्यम चित्रपटाच्या तुलनेत वेगळे आहे. तासनतास शूटिंग करण्यापासून ते भावनिक दृश्ये करताना त्यातील तांत्रिक बाजूंमध्ये नेमकेपणा आणण्यापर्यंत टेलिव्हिजनने आपल्याला आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर काढले.

ती सांगते की हे प्रारंभिक दिवस तिला समृद्ध करणारे आणि विनम्रता देणारे होते. ज्यामुळे तिच्या कलेला नवीन पैलू मिळाले आहेत.

दीक्षा जोशी म्हणते, मी या आधी चित्रपट, नाटक, छोटे फॉरमॅट आणि जाहिरातीत काम केले आहे. पण टेलिव्हिजन माज्यासाठी अगदीच नवीन आहे. टेलिव्हिजनमध्ये वेग खूप जास्त असतो. त्यामुळे तुम्हाला भावनिक दृष्ट्या तयार आणि तांत्रिक दृष्ट्या जाणकार असावे लागते, तसेच दररोज सातत्य सांभाळावे लागते.

टेलिव्हिजनने मला शिकवले की लांबलचक दृश्यातही आपल्या व्यक्तिरेखेचा तोल कसा सांभाळायचा, सातत्य कसे सांभाळायचे आणि झटपट बदल होत असतानाही पात्राच्या भावनांशी कसे संलग्न राहायचे. हा अनुभव मला एक अभिनेता म्हणून वेगळाच आत्मविश्वास देणारा आहे.

# 'गणेश कार्तिकेय' मालिकेतील अष्टविनायक यात्रा सुरू

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई , दि. २:

सोनी सबवरील ह्यगाथा शिव परिवार की झ गणेश कार्तिकेयह्न या पौराणिक मालिकेत अष्टविनायक आस्था यात्रेच्या रुपातून गणेशाचा दिव्य प्रवास उलगडत आहे.



आध्यात्मिक भव्यता आणि हृदयस्पर्शी कौटुंबिक क्षण यांची सांगड घालत ही मालिका हा शोध घेत आहे की कशाप्रकारे हा दिव्य परिवार प्रेम, जबाबदारी, संघर्ष आणि क्षमाशीलता या मूल्यांचा अनुभव घेत आहे.

आगामी भागांमध्ये, गणेशाचा रिद्धी-सिद्धीसोबतचा भव्य विवाह सोहळा पार पडल्यानंतर, शुक्राचार्य (विष्णू शर्मा) आणि सिंधुरासुर (निर्भय वाधवा) गणेशाविरुद्ध आणखी एक कट रचतात आणि वारंवार चेतावणी मिळूनही अधर्माच्या मार्गावर चालत राहतात. अष्टविनायक यात्रा सुरू झाल्यानंतर पहिला मुक्काम मोरगावला आहे, जेथे सिंधुरासुर आपला पहिला दुर्गुण- अहंकार प्रकट करतो. त्याच्या परिणामामुळे गावकरी गणेशाची पूजा-अर्चा करणे सोडून देतात.

सर्वत्र गोंधळ माजतो आणि जगत नावाच्या तरुणाच्या जीवनात एक दिव्य चमत्कार होतो.

'गणेश कार्तिकेय' मालिकेत गणेशाची भूमिका करणारा निर्णय समाधिया म्हणतो, मोरगावपर्यंतचा गणेशाचा प्रवास म्हणजे केवळ कुणाशी तरी युद्ध करण्याचा प्रवास नाही, तर सर्वांना आपला अहंकार सोडून देण्यासाठी दिलेला धडा आहे.

या कथेमधून हे समजते की, थोडीशी श्रद्धा देखील विराट अहंकारावर मात करू शकते. लोकांमध्ये पुन्हा श्रद्धा आणून त्यांना विनम्र राहण्यास शिकवणारा गणपती साकारताना मला खूप छान वाटते.

# पत्ताकोबीतील किड्याने घेतला जीव

## डोक्यात 20-25 गाठी, फास्ट फूडमुळे मृत्यूही झाला

■ वृत्तसंस्था, लखनऊ, दि. २:

यूपीच्या अमरोहामध्ये फास्ट फूड खाल्ल्याने 18 वर्षांच्या 12वीच्या विद्यार्थिनी इलमा नदीमचा दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात मृत्यू झाला. इलमाला एक महिन्यापूर्वी टायफॉइड झाला होता. त्यानंतर तिची तब्येत सतत बिघडत गेली.



नोएडा येथील एका खासगी रुग्णालयात सीटी स्कॅन आणि एमआरआय करण्यात आला. तपासणीत इलमाच्या मेंदूत 20-25 गाठी आढळल्या. डॉक्टरांच्या मते, या गाठी परजीवी संसर्गामुळे असू शकतात, जो फास्ट फूडमध्ये वापरल्या जाणाऱ्या कोबीमार्फत शरीरात पोहोचला.

अशा परिस्थितीत प्रश्न पडतो की फास्ट फूड किती धोकादायक आहे? कोबी कोणाचा जीव घेऊ शकतो का? इलमावर 9 दिवस दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात उपचार सुरू होते. डॉक्टरांनी तिच्या मेंदूवर शस्त्रक्रिया केली होती.

अमरोहामध्ये डिसेंबर 2025 मध्ये, 11 वीच्या विद्यार्थिनीचा फास्ट फूड खाल्ल्याने मृत्यू झाला होता. दिल्ली एम्समध्ये तिच्यावर उपचार सुरू होते. डॉक्टरांनी सांगितले की, जास्त फास्ट फूड खाल्ल्याने मुलीची आतडी एकमेकांना चिकटली होती. पचनसंस्था पूर्णपणे खराब झाली होती.

तिच्यावर शस्त्रक्रियाही करण्यात आली, पण ती वाचू शकली नाही. कुटुंबीयांचे म्हणणे आहे की, अहाना लहानपणापासूनच घरच्या जेवणाऐवजी चाऊमीन, पिज्झा आणि बर्गर खात असे. तेच तिच्या मृत्यूचे कारण बनले.

अमरोहा येथील अफगानान मोहल्ल्यातील रहिवासी ११वीची विद्यार्थिनी अहाना हिचा फास्ट फूड खाल्ल्याने मृत्यू झाला होता.

# भाजप-काँग्रेस समर्थक भिडले:

■ वृत्तसंस्था, बल्लारी, दि. २

कर्नाटकातील बेल्लारी येथे वाल्मीकींचे बॅनर फाडल्याच्या कारणावरून गुरुवारी भाजप-काँग्रेस समर्थक भिडले. दोन्ही गटांमध्ये झालेल्या हिंसक झटापटीत एका व्यक्तीचा मृत्यू झाला.



ही झटापट भाजप आमदार जनार्दन रेड्डी आणि काँग्रेस आमदार भरत रेड्डी यांच्या समर्थकांमध्ये बॅनर लावण्यावरून झाली, जे शहरात वाल्मीकी पुतळा अनावरण कार्यक्रमापूर्वी पोस्टर-बॅनर लावत होते.

भरत रेड्डी यांचे समर्थक अवमभावी परिसरात जनार्दन रेड्डी यांच्या घरासमोर बॅनर लावण्याचा प्रयत्न करत होते, ज्याला रेड्डींच्या समर्थकांनी विरोध केला. यामुळे दोन्ही गटांमध्ये जोरदार वाद झाला. दोन्ही बाजूंनी दगडफेक झाली, पोलिसांवरही दगड फेकण्यात आले.

जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला आणि हवेत गोळीबारही करण्यात आला. शुक्रवारी पोलिसांनी भाजप आमदार जनार्दन रेड्डी, माजी मंत्री श्रीरामुलु, शेखर, अलीखान आणि सोमशेखर रेड्डी यांच्यासह 11 जणांविरुद्ध ब्रूसपेट पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे.

बेल्लारीमध्ये याच वाल्मीकी मूर्तीचे अनावरण कार्यक्रम होणार होता. भरत रेड्डीचे समर्थक जनार्दन रेड्डीच्या घरासमोर बॅनर लावत होते, ते फाडून काढण्यात आले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये खासगी बंदूकधारी व्यक्ती लोकांवर हवेत गोळ्या झाडताना दिसला.

एसपी म्हणाले- चुकून झालेल्या गोळीबारात एका व्यक्तीचा मृत्यू एसपी बल्लारी रणजीत कुमार बंदारू म्हणाले- काल संध्याकाळी भाजप आमदार जनार्दन रेड्डी यांच्या घरासमोर वाल्मिकी मूर्तीच्या उद्घाटनाचे पोस्टर लावण्यावरून झालेल्या वादामुळे दंगल झाली. या वादामुळे जनार्दन रेड्डी यांच्या समर्थकांमध्ये आणि शहरातील आमदारांच्या समर्थकांमध्ये दंगल आणि दगडफेक झाली.

गोळीबारही झाला, आणि चुकून झालेल्या गोळीबारात राजशेखर नावाच्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला. मृताला रुग्णालयात नेण्यात आले. शवविच्छेदन पूर्ण झाले आहे.

तक्रारदाराने सांगितले- बॅनर फाडल्यानंतर जमाव हिंसक झाला आपल्या तक्रारीत, 47 वर्षीय चनाला शेखर यांनी सांगितले की, आमदार भरत रेड्डी शहरात रस्ते आणि सार्वजनिक प्रकल्पांसह अनेक विकासाची कामे करत आहेत. याच अंतर्गत, एसपी सर्कलजवळ वाल्मिकीच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी एक मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

1 जानेवारी रोजी संध्याकाळी 6.30 ते 7.30 च्या दरम्यान, आरोपी जनार्दन रेड्डी, सोमशेखर रेड्डी आणि इतरांनी जनार्दन रेड्डी यांच्या घराशेजारी लावलेल्या बॅनरचे नुकसान केले. यानंतर दोन्ही गटांमधील संघर्ष हिंसक झाला.

# माजी जिल्हाधिकारी अटकेत

## 1500 कोटींच्या जमीन घोटाळ्याचे प्रकरण, उप-तहसीलदारासोबत 1 कोटी घेतल्याचा आरोप

■ वृत्तसंस्था, सुरेंद्रनगर, दि. २:

प्रवर्तन निदेशालय (एऊ) च्या पथकाने 1500 कोटी रुपयांच्या जमीन घोटाळ्याप्रकरणी गुजरातच्या सुरेंद्रनगरचे माजी जिल्हाधिकारी राजेंद्र पटेल यांना अटक केली आहे. शुक्रवारी ईडीची तीन पथके गांधीनगर येथील राजेंद्र पटेल यांच्या निवासस्थानी पोहोचली, जिथे त्यांची आधी चौकशी करण्यात आली.



ईडीच्या पथकाने 20 आणि 21 डिसेंबर रोजी सुरेंद्रनगर जिल्ह्यात छापे टाकले होते. यात सुरेंद्रनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र पटेल यांच्या व्यतिरिक्त त्यांचे पीए जयराजसिंह झाला, नायब तहसीलदार चंद्रसिंह मोरी आणि लिपिक मयूरसिंह गोहिल यांच्या घरावर छापा मारण्यात आला होता.

छापेमारीदरम्यान मोरी यांच्या घरातून 60 लाखांहून अधिक रोख रक्कमही जप्त करण्यात आली होती. ही रोख रक्कम त्यांच्या बेडरूममध्ये लपवून ठेवण्यात आली होती. पैसे मिळाल्यानंतर मोरी यांना अटक करण्यात आली होती.त्यानंतर 23 डिसेंबर रोजी पीएमएलएच्या कलम 17 अंतर्गत नोंदवलेल्या त्यांच्या जबाबात मोरी यांनी कबूल केले होते की जप्त केलेली रोख रक्कम लाचेचे पैसे आहेत, जे अर्जदारांकडून थेट किंवा मध्यस्थांमार्फत घेण्यात आले होते.

उप मामलतदार चंद्रसिंह मोरी यांना २३ डिसेंबर रोजी ईडीच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आले होते.

आधी १५०० कोटी रुपयांच्या जमीन घोटाळ्याबद्दल जाणून घ्याउप तहसीलदार मोरी यांना सौराष्ट्र घरखेड़ टेनेंसी सेटलमेंट अँड ॲग्रिकल्चरल लँड्स ऑर्डिनन्स, १९४९ अंतर्गत उद्भव (जमीन वापरामध्ये बदल) अर्जांच्या टायटल व्हेरिफिकेशन आणि प्रोसेसिंगचे काम सोपवण्यात आले होते. परंतु, मोरी यांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर केला.

मोरी यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी थानच्या विद परिसरात १५०० कोटी किमतीच्या ३६०० बिघांहून अधिक जमिनीच्या फाईलला लवकर मंजुरी मिळवून देण्यासाठीच्या अर्जांवरून लाच घेतली. ईडीने सांगितले की, लाचेची रक्कम प्रति चौरस मीटरनुसार निश्चित करण्यात आली होती.

ईडीच्या चौकशीत समोर आले आहे की, या जमिनीच्या सर्वे क्रमांकात अनेक नावे जोडण्यात आली होती. सर्वेमध्ये नावे जोडण्यासाठी लाच घेतली जात होती.

# एस ए 20 मध्ये पहिल्यांदा सुपर ओव्हर

■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. २

एस ए 20 लीगमध्ये वांडरर्स स्टेडियमवर जॉबर्ग सुपर किंग्ज आणि डर्बन सुपर जायंट्स यांच्यातील सामन्याचा निकाल सुपर ओव्हरने लागला, जो स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच खेळला गेला. या रोमांचक सामन्यात जॉबर्गने सुपर ओव्हरमध्ये विजय मिळवून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले.



नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या जॉबर्ग सुपर किंग्जने 20 षटकांत 4 गडी गमावून 205 धावा केल्या. कर्णधार फाफ डु प्लेसिस (30 चेंडू, 47 धावा) आणि मॅथ्यू डी विलियर्स (26 चेंडू, 38 धावा) यांनी 8.4 षटकांत 89 धावांची सलामीची भागीदारी केली. यानंतर, अमेरिकन आंतरराष्ट्रीय खेळाडू शुभम रंजनने 31 चेंडूंमध्ये नाबाद 50 धावा केल्या. त्याने डोनोवन फरेरासोबत 16 चेंडूंमध्ये 49 धावांची नाबाद भागीदारी केली. फरेराने 10 चेंडूंमध्ये 33 धावा कुटल्या.

दुसरीकडे, डर्बनसाठी नूर अहमद आणि सायमन हार्मर या फिरकी गोलंदाजांच्या जोडीने 8 षटकांत 33 धावा देऊन 4 बळी घेतले. नूर अहमदने 4 षटकांत 12 धावा देऊन 3 बळी घेतले. 1

# दारुड्या चालकाने जमावावर गाडी चढवली

■ वृत्तसंस्था, बंगळुरू, दि. २: नवीन वर्षाच्या संध्याकाळी बेंगळुरूमध्ये नशेत असलेल्या एका चालकाने उत्सव साजरा करणाऱ्या लोकांना धडक दिली. या रस्ते अपघातात चार लोक गंभीर जखमी झाले. ही घटना बुधवारी रात्री सुमारे 10.15 वाजता घडली. आरोपीची ओळख 48 वर्षीय सुनील कुमार सिंग बी अशी झाली आहे. आरोपी व्यवसायाने वकील आहे.
पोलिसांनी सांगितले की, फिनिक्स मॉल ऑफ एशियामधून एक महिंद्रा वश-700 भरधाव वेगाने बाहेर पडली, त्या परिसरात लोकांची गर्दी होती.नशेत असलेल्या चालकाने आधी फूटपाथवर लावलेल्या लोखंडी बॅरिकेड्सना धडक दिली आणि नंतर पादचाऱ्यांना चिरडले.

जखमींची ओळख अक्कम्मा (30), चंद्रशेखर (36), राजलक्ष्मी (53) आणि प्रज्वल शशिधर चावडी (27) अशी झाली आहे. पोलिसांनी मॉलच्या सुरक्षा प्रमुखालाही आरोपी बनवले आहे. एफआयआरमध्ये म्हटले आहे की, मॉल व्यवस्थापनाने जास्त गर्दीच्या कार्यक्रमादरम्यान मॉलच्या आत आणि आसपासच्या लोकांसाठी योग्य सुरक्षा उपाय लागू केले नाहीत.

# 12 वर्षांतील सर्वात मोठे क्रीडा कॅलेंडर

## 2026 मध्ये क्रिकेट, फुटबॉल आणि हॉकीसह 5 विश्वचषक

■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. २

आधुनिक युगात क्रीडा स्पर्धांच्या दृष्टीने 2026 हे सर्वात मोठे वर्ष असणार आहे. 2014 नंतर पहिल्यांदाच एका वर्षात क्रिकेट, फुटबॉल आणि हॉकी विश्वचषक होणार आहेत.




याशिवाय, या वर्षी महिला टी-20 विश्वचषक, पुरुष अंडर-19 क्रिकेट विश्वचषक होणार आहेत. त्याचबरोबर कॉमनवेल्थ आणि एशियन गेम्ससारख्या मल्टी-स्पोर्ट, मल्टी-नेशन मेगा स्पर्धा देखील असतील. आंतरराष्ट्रीय स्पर्धांसोबत आयपीएल आणि डब्ल्यूपीएल तर आहेतच.

अजूनही यादी संपलेली नाही. याच वर्षी टेनिसच्या 4 ग्रँड स्लॅम स्पर्धा होतील. 2026 मध्ये हे देखील निश्चित होईल की बुद्धिबळाचा विश्वविजेता डी गुकेश याला पुढील वर्ल्ड चेस चॅम्पियनशिपसाठी कोण आव्हान देईल. पुढे वाचा, वर्षभरातील महत्त्वाच्या क्रीडा स्पर्धा कधी आणि कुठे होतील...

2026 च्या अखेरीस क्रिकेटचा वनडे आशिया कप आयोजित केला जाऊ शकतो, मात्र एशियन क्रिकेट कौन्सिलने अद्याप याची घोषणा केलेली नाही.


## शनिवार दि. ३ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २२६ | ६८० | २५० | २६० | २३७ | २४९ | १६९ | ७०० |
| ३८० | ७८९ | ३४० | ३५० | ५७० | ४५६ | ३४९ | २५० |
| ४७० | ५९० | ११५ | ४४० | ६७९ | ३५७ | २६८ | १६० |

| जोडी | जोडी |
|---|---|
| १६ - ४६ - ७५ - ८२ | २४ - ५४ - ६१ - ७१ |
| १० - ४० - ७९ - ८९ | २८ - ५८ - ६३ - ७३ |
| १३ - ४३ - ७२ - ८५ | २२ - ५५ - ६६ - ७७ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ३ जाने. २०२६

## शनिवार दि. ३ जानेवारी २०२६

सर्व बाजार साठी

२५ - ३५ - ६० - ९०
२४ - ३४ - ६८ - ९८
२७ - ३७ - ६१ - ९१
--------------------
३४९ - २३८ - २४० - ९००
६७९ - ५८० - १६९ - २३४
२०० - ४९० - ६०० - ३६०

सर्व बाजारासाठी

| गुरू. ते शनि. ओपन डे | | | गुरू. ते शनि. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| १९९ | १८९ | १७९ | ४८० | ७९९ | १२५ |
| ६६७ **९** | २७९ **८** | ३५९ **७** | ३९० **२** | ४४७ **५** | ३५० **८** |
| ३८८ | ३५० | २५० | ५७० | ११३ | ४६८ |

| गुरू. ते शनि. क्लोज डे | | | गुरू. ते शनि. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| १२८ | ११० | १४८ | ४९० | १५० | १२४ |
| ३८० **१** | २२८ **२** | ३४६ **३** | ५८० **३** | २६८ **६** | २७८ **७** |
| ६७८ | ३३६ | ३०० | ६७० | ३६७ | ४६७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
१ २ ९ ८ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## आजचे राशीभविष्य

**मेष :** नववर्षाची आश्वासक सुरूवात होईल. हे वर्ष सकारात्मक परिणाम घेऊन येईल. तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. आरोग्याच्या समस्या दूर होतील. तुमच्या कामाच्या ठिकाणी तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या कामांवरून संघर्ष उद्भवू शकतात, परंतु तुम्ही चातुर्याचा वापर करून तो प्रश्न सोडवाल. हे वर्ष तुमच्यासाठी आर्थिकदृष्ट्या अनुकूल राहील. नोकरी करणाऱ्यांना उत्तम यश मिळू शकते.

**मिथुन :** कौटुंबिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी जास्त वेळ घालवू शकत नाही. तुमची प्रतिष्ठा वाढेल. या वर्षी व्यवसाय करणाऱ्यांची भरभराट होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** नोकरी करणाऱ्यांना लक्षणीय फायदा मिळण्याची शक्यता आहे आणि जे स्वयंरोजगार करतात त्यांच्या व्यवसायात लक्षणीय बदल होण्याची शक्यता आहे. यामुळे तुमच्या आयुष्यात लक्षणीय बदल घडणार आहेत.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाने भरलेला असणार आहे. तुमचे लक्ष तुमच्या कामात सुधारणा करण्यावर असेल. मुले त्यांच्या पालकांकडे अधिक लक्ष देतील आणि त्यांचे ऐकतील.

**कन्या :** तुमचे नशीब बदलू शकते. या वर्षी तुम्ही लांब पल्ल्याच्या सहलीला जाण्याची शक्यता आहे. ही सहल फायदेशीर ठरेल. व्यवसायात प्रगतीचे संकेत आहेत.

**तुळ :** या वर्षी, नशीब तुमच्यासोबत असेल. तुम्ही तुमची बहुतेक कामे यशस्वीरित्या पूर्ण कराल. तुमचे प्रेमसंबंध अधिक दृढ होतील आणि तुम्ही तुमच्या प्रियजनांसोबत उत्तम वेळ घालवाल.

**वृश्चिक :** मुलांच्या शिक्षणासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो. यामुळे तुम्ही व्यस्त राहाल. बँकिंग आणि वित्त क्षेत्रातील लोकांना काही अडचणींना सामोरे जावे लागू शकते. परिश्रमपूर्वक काम करतील. प्रमोशन मिळेल.


**धनु :** आज नशीब तुमच्या बाजूने असेल. तुम्ही नोकरी असो वा व्यवसाय, तुम्ही जे काही करण्याचा विचार करत आहात ते यशस्वी व्हाल. तुम्ही ज्याची वाट पहात होतात, त्या अपेक्षित बदलीची आज सूचना मिळू शकते.

**मकर :** व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायात नफा होण्याची शक्यता आहे. या वर्षी उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. नोकरी करणाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून कामाच्या ठिकाणी सन्मानित केले जाऊ शकते.

**कुंभ :** जर तुम्ही मालमत्तेच्या समस्येला तोंड देत असाल तर आज निकाल तुमच्या बाजूने येण्याची शक्यता आहे. महत्वाचं काम झाल्याने मनावरचं ओझ उतरेल, समाधान मिळेल. आर्थिक परिस्थिती चांगली असेल.

**मीन :** आर्थिक क्षेत्रातील सकारात्मक प्रयत्नांचे अनुकूल परिणाम मिळतील. या वर्षी, तुम्ही वाहन किंवा घर खरेदी करू शकाल. सामाजिक किंवा व्यावसायिक जीवनात जवळच्या मित्रांकडून मदत मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २३१६




**आडवे शब्द :-**
१) दुसऱ्या राशीचा, बैल
३) कोपराचा प्रहार
६) उबदार पांघरुण (इं.)
८) गोमाता
९) ऐट, दिमाख
१०) काड्यांचा झाडू, 'आप' ची निशाणी
११) विधानसभेचा सदस्य
१३) तुच्छतेने भिकारी
१५) देवाच्या पायापाशी
१६) निर्बुद्ध
१७) संगीतातील एक राग
१८) गवताचे रुंद पान
१९) मातृभाषा
२१) आश्चर्य
२२) मतदारयादीत नाव असलेला
२५) विंचवाचा दंश करण्याचा कांटा
२६) नारळाचे झाड
२७) शंकराच्या गळ्याभोवतीचा सरपटणारा प्राणी
२८) तपःसामर्थ्य
२९) वेळ न दवडता, चटकन
३१) कापड वा जमीन मोजण्याचे एक साधन
३२) नड, जरुरी
३४) किंमत
३६) वेळ घालविणे
३८) हत्ती
३९) जमा आणि खर्च यांची बरोबरी
४०) अर्धवर्तुळाकार
४२) इटलीची राजधानी केस
४३) छोटा डोंगर
४५) झकास, छान
४६) जनक राजाची मुलगी, सीता
४९) छोटी लढाई
५१) पदर
५२) पारद
५३) बेबनाव, वितुष्ट
५५) शरम
५७) एक पवित्र नदी
५९) बाजेची कापडी पट्टी
६०) कावळा ६१) पोलीस

**उभे शब्द :-**
१) खोटा अभिमान
२) सहा धावांचा फटका
३) न वापरलेला
४) निष्णांत
५) समाचार
६) रम्य
७) भीमा जवळचे आघाताचे शस्त्र
१०) बारीक दगड
११) लढाऊ जहाजांचा ताफा
१२) रमल विद्या जाणणारा
१४) पाठवणी
१८) संगोपन
२०) अज, मेंढा
२२) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२३) गुलामगिरी
२४) जयाचा नामघोष
२५) हल, शेतातील एक अवजार
२६) माजला
२७) प्रजाजन
३०) निरुद्योगी
३१) गाईचे, गोरस
३३) भारतीय सैनिक, तरुण
३५) लक्ष्मीचे एक नाव
३७) फुलांची टोपली
४१) धनी
४४) मुलगी, मुलीची रास
४५) दहावी रास
४७) आश्चर्याची गोष्ट
४८) पळून गेलेला, फरार
४९) देशाचे नाणे
५०) सुसर
५१) पायदळाचा शिपाई
५४) केशवृद्धीची सुवासिक वनस्पती
५६) मत्सर
५८) थंड

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विनापासेस गौणखनिज वाहतुकीला लगाम

**अचलपूरात रेती माफियांवर महसूल विभागाची धडक कारवाई ■ दिवस-रात्र तपासणीसाठी विशेष पथकांची स्थापना**

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा, (दि.2)-** अचलपूर तालुक्यात वाढत चाललेल्या रेती चोरी तसेच विनापासेस व क्षमतेपेक्षा अधिक गौणखनिज वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कडक पावले उचलत व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. यासाठी विशेष पथकांची स्थापना करण्यात आली असून, दिवसासह रात्री उशिरापर्यंत वाहनांची रॉयल्टी व पास तपासणी सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर तात्काळ कारवाई केली जात असल्याने अवैध वाहतुकीत खळबळ उडाली आहे.



गेल्या काही वर्षांत तालुक्यात रेती चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर, नुकतेच तहसीलदारपदाचा पदभार स्वीकारलेले सुदर्शन सहारे यांनी यासंदर्भात आढावा बैठक घेत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट आणि ठोस सूचना दिल्या. त्यानुसार कारवाई अधिक गतिमान व प्रभावी करण्यात आली आहे. रेती चोरी व बेकायदेशीर गौणखनिज वाहतूक रोखण्यासाठी बैतूल नाका, ठोकबड्डा आणि अचलपूर नाका येथे तीन चेकपोस्ट उभारण्यात आले असून, येथे 24 तास बैठे पथक कार्यरत राहणार आहे. याशिवाय, संयुक्त भरारी पथकाद्वारेही सातत्याने नजर ठेवली जाणार आहे. या विशेष पथकांमध्ये नायब तहसीलदार, तलाठी, कोतवाल आदी अधिकारी व कर्मचारी सहभागी असून, तहसीलदारांच्या निर्देशानंतर सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत रॉयल्टी तपासणीला वेग आला आहे. त्यामुळे तालुक्यातील अवैध गौणखनिज वाहतुकीला आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात तहसीलदार सुदर्शन सहारे यांनी नागरिक व वाहनचालकांना आवाहन करताना सांगितले की, गौणखनिज वाहतूक करताना रीतसर परवाना घेणे बंधनकारक आहे. मध्यप्रदेश रेती वाहतूक पास तसेच महाराष्ट्र रॉयल्टी पास अनिवार्य असून, पासमध्ये नमूद क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करू नये. नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. महसूल विभागाच्या या कडक भूमिकेमुळे अचलपूर तालुक्यातील रेती चोरीविरोधातील कारवाईला नवी धार मिळाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# आयुक्तांकडून ईव्हीएम केंद्राची सखोल पाहणी

**महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.2) -** सार्वत्रिक निवडणूक 2025-26 शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. याच अनुषंगाने निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शुक्रवार, दि. 02 जानेवारी 2026 रोजी अमरावती येथील सांस्कृतिक भवनाजवळील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) साठवणूक व व्यवस्थापन केंद्राची सखोल पाहणी केली.





या केंद्रात ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रांची साठवणूक करण्यात आली असून सध्या प्रथम स्तरीय तपासणी (एफएलसी) प्रक्रिया सुरू आहे. निवडणुकीपूर्वी प्रत्येक मशीनची तांत्रिक तपासणी करून त्यांची कार्यक्षमता व सुरक्षितता सुनिश्चित केली जात आहे. पाहणीदरम्यान आयुक्तांनी ईव्हीएम व व्हीव्हीपॅटच्या सुरक्षित साठवणुकीसाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, सीसीटीव्ही निगराणी, सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती, अग्निसुरक्षा व्यवस्था तसेच प्रवेश व निर्गमन नियंत्रण प्रणालीचा आढावा घेतला.

निवडणूक प्रक्रिया अत्यंत संवेदनशील असल्याने कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. ईव्हीएम गोदामाची नियमित तपासणी, 24 तास सीसीटीव्ही निरीक्षण, नोंदवही अद्ययावत ठेवणे आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता व विश्वासार्हता राखणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी असून, सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. पाहणीदरम्यान निवडणूक शाखेचे अधिकारी, पोलीस विभागाचे प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते. आढळलेल्या किरकोळ त्रुटी तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देत आगामी निवडणुकांसाठी अमरावती महानगरपालिका पूर्णतः सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# बस झाडावर अडकल्याने 50 प्रवाशांचे प्राण वाचले

**धारणी तालुक्यातील गोंडवाडी गावाजवळील घटना**

महासागर | प्रतिनिधी

**धारणी,(दि.2)-** रस्त्याच्या कड्यावरून बस घसरून झाडात अडकल्याने पुढील भिषण अपघाताचा अनर्थ टळल्याची घटना 2 जानेवारी रोजी सकाळी घडली. बस झाडाला अडकली नसती, तर ती थेट तलावात कोसळून मोठी दुर्घटना घडली असती. या अपघातात बसमधील सुमारे 50 प्रवासी सुदैवाने बचावले.

सदर अपघात धारणीपासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर घडला. खंडवाङ्कअमरावती मार्गावरील श्रीराम बस ही दररोजप्रमाणे सकाळी 7 वाजता खंडवावरून अमरावतीकडे निघाली होती. गोंडवाडी परिसरात रस्त्यालगत असलेल्या तलावाजवळून जात असताना, असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या खाली घसरली. मात्र, कडेला असलेल्या मोठ्या झाडात बस अडकली आणि ती पूर्णपणे खाली जाण्यापासून थांबली. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी धाव घेत प्रवाशांना बाहेर काढण्यास मदत केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस व महसूल प्रशासनाचे पथक तसेच आपत्कालीन मदत यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. वेळेत




मदत मिळाल्याने प्रवाशांमध्ये दिलासा निर्माण झाला. काही प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली असली, तरी कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र, परिस्थिती नियंत्रणात आणल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. झाडामुळे मोठा अनर्थ टळल्याने प्रवासी व स्थानिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# डॉ. मोईन रझांवर दाखल हत्येचा गुन्हा रद्द करा!

**तो मृत्यू हृदय विकाराने झाल्याचा दावा**

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर,(दि.2) -** परतवाडा-अंजनगाव सुर्जी परिसरात डॉक्टर समुदायात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. इंडियन डेंटल असोसिएशन आणि नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन अचलपूर शाखेच्या वतीने प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले असून, संघटनेचे सदस्य डॉ. मोईन रझा अब्दुल लतीफ यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला हत्येचा गुन्हा हा जाणीवपूर्वक रचलेला कट असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अंजनगाव येथे नगर परिषद निवडणुकीनंतर झालेल्या वादानंतर एका व्यक्तीचा अचानक मृत्यू झाला होता. या मृत्यू प्रकरणाला थेट हत्येचे स्वरूप देत काही व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये डॉ. मोईन रझा



अब्दुल लतीफ यांचा समावेश झाल्याने खळबळ उडाली आहे. अचानक मृत्यू असताना तो हत्या कसा घोषित करता येतो, असा सवाल डॉक्टर संघटनांसह संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रातून उपस्थित केला जात आहे.

डॉक्टर संघटनांचे म्हणणे आहे की, अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात कोणताही ठोस, विश्वासार्ह किंवा कायदेशीर पुरावा नसताना डॉ. मोईन रझा यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला. ही तक्रार पूर्णपणे तथ्यहीन असून संबंधित डॉक्टरांची वैयक्तिक व व्यावसायिक प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. डॉ. मोईन रझा हे गेल्या पंधरा वर्षांपासून दंतवैद्य म्हणून प्रामाणिकपणे, कायद्याच्या चौकटीत आणि वैद्यकीय नैतिकतेनुसार सेवा देत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनांनी प्रशासनाकडे या प्रकरणाची तातडीने निष्पक्ष व सखोल चौकशी करून खोटी तक्रार दाखल करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित डॉक्टरांना कोणताही मानसिक त्रास अथवा अपमानास्पद वागणूक दिली जाऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार बोंडे यांनी सांगितले की, प्राथमिक पीएम अहवालानुसार मृत्यूचे कारण हार्ट अटॅक असल्याचे स्पष्ट झाले असून प्रकरणाचा तपास सुरू आहे. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात भीती व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

# भ्रष्टाचारमुक्त शासन हवे - खा. कॉ. पी. संदोष कुमार

**चांदूर रेल्वेत भाकप कार्यालयाचे उद्घाटन; शताब्दी वर्षानिमित्त भव्य सभा**

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, (दि. 2) -** भ्रष्टाचारमुक्त शासन हवे असल्यास राजकारणाचे शुद्धीकरण आवश्यक आहे आणि त्याची जबाबदारी जनतेने स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन केरळचे राज्यसभा खासदार कॉ. पी. संदोष कुमार यांनी केले. प्रचंड कमिशनखोरीमुळे मोजक्या लोकांची संपत्ती वाढत असताना सर्वसामान्य जनता आर्थिक संकटात सापडत असल्याचे ते म्हणाले.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) कार्यालयाच्या उद्घाटन




व पक्षाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित सभेत ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी भाकपचे माजी राज्य सचिव कॉ. तुकाराम भस्मे होते. राष्ट्रीय सचिव कॉ. डॉ. भालचंद्र कानगो यांनी गरीबी, बेरोजगारी, विषमता, मजुरांचे हक्क, सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण इत्यादी मुद्यांवर पक्षाची भूमिका स्पष्ट केली.

राज्य सचिव कॉ. अ‍ॅड. सुभाष लांडे व सहसचिव कॉ. श्याम काळे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. सत्ता व पदांसाठी स्वार्थी जुळवाजुळव वाढली आहे. अशा बाजारू राजकारणात नैतिकता हरवली आहे. अशावेळी वंचित, शेतकरी, मजूर, आदिवासी, दलित, ओबीसी, विद्यार्थी व तरुणांच्या प्रश्नांसाठी डावा विचारच संघर्ष करतो, असे कॉ. भस्मे यांनी सांगितले.

कार्यक्रमात वयोवृद्ध कार्यकर्त्यांचा गौरव, प्रा. विजय रोडगे लिखित 'कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास' पुस्तकाचे प्रकाशन, तसेच शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. प्रास्ताविक कॉ. विनोद जोशी, संचालन कॉ. सतीश चौधरी यांनी केले. साजिद जानवानी, सचिन चंदाराना, नगरसेवक सुमेध सरदार आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# वन्य प्राण्यांच्या भीतीने बळीराजा असुरक्षित

**वीजपुरवठा सुरू ठेवण्याचा शेतकऱ्यांची शासनाला मागणी**

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी,(दि.2) -** अंजनगाव बारी परिसरातील 22 गावांतील शेतकऱ्यांना पिकांच्या ओलीतासाठी रात्री-अपरात्री शेतात जावे लागत आहे. याच वेळी जंगलातील वन्य प्राणी शेतशिवारातच नव्हे तर गावाच्या हद्दीपर्यंत निर्भयपणे फिरत असल्याने शेतकऱ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. कडाक्याची थंडी आणि अंधारात ओलीत करताना जंगली डुक्कर, बिबट्यासारख्या हिंस्र प्राण्यांचा सामना झाल्यास प्रतिकार करणे कठीण ठरत आहे. या पार्श्वभूमीवर



शेतकऱ्यांनी सकाळी 8 ते सायंकाळी 5 या वेळेत दिवसा वीजपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. दिवसा वीज उपलब्ध झाल्यास जीवितहानी टाळता येईल तसेच वन्य प्राण्यांपासून संरक्षण होण्यास मदत होईल, असा शेतकऱ्यांचा ठाम दावा आहे. या मागणीची तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. परिसरात सुमारे 1,275 कृषीपंप असून 2,400 हेक्टर जमीन ओलीताखाली आहे. त्यामुळे दररोज शेकडो शेतकऱ्यांना रात्री शेतात थांबावे लागते. वनविभागाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून, अनेक निवेदनांनंतरही वनक्षेत्राला तारेचे कुंपण बसविण्यात आलेले नाही. सन 2025 मध्ये वन्य प्राण्यांमुळे 150 पेक्षा अधिक अपघात झाले असून, बिबट्याने शेकडो पाळीव प्राण्यांचा बळी घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषीपंपांसाठी दिवसा 12 तास वीजपुरवठ्याचे आश्वासन दिले होते.

# शकुंतला रेल्वेचा 112 वा वाढदिवस उत्साहात

**पुनरुज्जीवनाची मागणी जोरदार**

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा, (दि.2)-** विदर्भाच्या अस्मितेचे प्रतिक असलेल्या ऐतिहासिक शकुंतला रेल्वेचा 112 वा वाढदिवस आज (1 जानेवारी 2025) अचलपूर रेल्वे स्थानकात शकुंतला रेल्वे बचाव समितीतर्फे उत्साहात आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. समितीचे सत्याग्रही, रेल्वेप्रेमी नागरिक,




सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होती.

कार्यक्रमाची सुरुवात शकुंतला रेल्वेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या वेळी वक्त्यांनी शकुंतला रेल्वेचा गौरवशाली इतिहास, विदर्भातील सामाजिक-आर्थिक विकासात तिचे असलेले योगदान तसेच सामान्य नागरिकांशी असलेले भावनिक नाते याची आठवण करून दिली.



शकुंतला रेल्वे ही केवळ प्रवासी-वाहतुकीचे साधन नसून विदर्भाच्या अभिमानाचे प्रतिक असल्याचे मत व्यक्त करत तिचे तातडीने पुनरुज्जीवन होणे काळाची गरज असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. रेल्वे पुन्हा सुरु करण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आणखी व्यापक व तीव्र रूप देण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त झाला. कार्यक्रमाच्या शेवटी शकुंतला रेल्वे जिवंत झालीच पाहिजे या घोषणा देत परिसर दुमदुमला. संघर्ष आणि एकतेचा संदेश देत वाढदिवस सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# शिक्षकांच्या पगारावर संचमान्यतेची टांगती तलवार!

**मे 2026च्या मेगा भरतीपूर्वी शाळांना 'डेडलाईन'चं टेन्शन ■ पगार रोखण्याचे आदेश**

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.2)-** राज्यातील शिक्षक भरतीप्रक्रियेत महत्त्वाचा बदल करत शाळांच्या संचमान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष 2025-26 अखेर म्हणजे मे 2026 पर्यंत संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन शिक्षक पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भातील शासननिर्णय प्रसिद्ध केला असून, या निर्णयामुळे येत्या काळात शिक्षक भरतीमधील पदांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च



माध्यमिक शाळांमधील शिक्षक भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून करण्यात येते. सध्या या भरतीप्रक्रियेत एकूण मंजूर पदांपैकी 80 टक्क्यांपर्यंत रिक्त पदे भरण्याची तरतूद आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी 2025 च्या निकालाच्या आधारे ही पदभरती प्रक्रिया सुरू आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात शिक्षक सेवानिवृत्त होत असतात, तसेच संचमान्यतेनुसार नवीन रिक्त पदे उपलब्ध होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी वेळेवर शिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 नुसार कोणत्याही शाळेत 10 टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त ठेवता येत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व स्तरांवरील शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष 2025-26 अखेर संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन, अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी 2025 मधील गुणांच्या आधारे

### 15 जानेवारीची डेडलाईन

दरम्यान, शाळांतील आधार वैध विद्यार्थ्यांची 20 ऑक्टोबर 2025 रोजीची संख्या ग्राह्य धरून शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी संचमान्यता निश्चित करण्यात आली आहे. ही संचमान्यता शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनला उपलब्ध करून देण्यात आली असून, तपासणी करून डिजिटल स्वाक्षरीनंतर शाळांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पायाभूत पदांबाबत अडचणी असलेल्या शाळांनी तातडीने प्रतिसाद द्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.सर्व संचमान्यता 15 जानेवारीपर्यंत शाळांना देणे बंधनकारक असून, त्यानंतरही 2025-26 ची संचमान्यता न झालेल्या शाळांचे वेतन देण्यात येणार नाही, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

शिक्षक पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत संभाव्य रिक्त पदांचा विचार न केल्यामुळे अनेक पदे भरतीतून वगळली जात होती आणि ती रिक्तच राहत होती. नव्या निर्णयामुळे ही पदे भरती प्रक्रियेत समाविष्ट होणार असून, त्यामुळे शिक्षक संख्येत वाढ होणार आहे.

# रस्त्यांवरील खड्डे, अवैध स्पीड ब्रेकर्समुळे कंबर-मानदुखीच्या रुग्णांत वाढ

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,(दि.2) -** शहरातील रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे तसेच गल्लीबोळात मनमानी पद्धतीने टाकण्यात आलेले स्पीड ब्रेकर्स नागरिकांच्या आरोग्यासाठी गंभीर ठरत आहेत. या कारणांमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच वाहनचालकांमध्ये कंबरदुखी, मणक्यांचे विकार, मानदुखी, स्पॉन्डायलोसिस व कॉम्प्रेशन इजांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे.



अंजनगाव सुर्जीतील बहुतांश रस्ते निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे उखडले असून ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. शासनाने रस्ते बांधकामासाठी लाखो रुपयांचा खर्च केला असला, तरी दर्जेदार कामाअभावी शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. याचा त्रास लहान बालकांपासून शालेय विद्यार्थी, महिला व वृद्ध नागरिकांना सहन करावा लागत आहे.

याशिवाय शहरातील अनेक गल्लीबोळांमध्ये स्थानिक नागरिकांनी कोणतीही परवानगी न घेता मोठे सिमेंटचे स्पीड ब्रेकर्स टाकले आहेत. काही ठिकाणी स्पीड ब्रेकरसाठी रस्ता खोदून ठेवण्यात आला असून पाच पावली परिसरातील तसेच झांजनपूर-काठीपुरा मार्गावरील स्पीड ब्रेकर्स जीवघेणे ठरत आहेत. अशा अवैध अडथळ्यांमुळे वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. नगरपालिका प्रशासनाने तातडीने शहराचा सर्वे करून आवश्यक त्या ठिकाणीच शास्त्रीय पद्धतीने स्पीड ब्रेकर्स बसवावेत, तसेच खराब रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. आगामी नगरपरिषद निवडणुकीत विजयी होणाऱ्या उमेदवारांनी दर्जेदार रस्त्यांची हमी द्यावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक



# बालांगण

## जाणून घ्या कोणतीही भाषा

**अ‍ॅप वर्ल्ड**

जगभरात अनेक भाषा बोलल्या जातात. विविध भाषांच्या माध्यमातून संदेश दिले जातात. आता सगळ्या भाषा येणं काही शक्य नाही. पण ही अडचण दूर करायची असेल तर ही अ‍ॅप्स डाउनलोड करता येतील. या अ‍ॅपमुळे कोणत्याही भाषेचं हिंदी भाषांतर होऊ शकतं.

* 'गुगल ट्रान्सलेट' हे अनोखं अ‍ॅप आहे. या अ‍ॅपमध्ये आता ऑफलाईन फीचरही अ‍ॅड झालं आहे. या अ‍ॅपच्या मदतीने १३० भाषांचा अनुवाद करता येईल. अ‍ॅप स्टोअरमधून हे अ‍ॅप डाउनलोड करता येईल.




* 'ट्रान्सलेट: टेक्स्ट अँड व्हॉईस ट्रान्सलेटर'च्या मदतीने १०० भाषांचं हिंदीमध्ये भाषांतर होऊ शकतं. एखादं वाक्य बोलून दाखवलं तरी त्याचं भाषांतर होऊशकतं.

* 'हिंदी-इंग्लिश ट्रान्सलेटर' हे अ‍ॅप इंग्रजीचा हिंदीत आणि हिंदीचा इंग्रजीत अनुवाद करायला मदत करतं.

* 'इंग्लिश टू हिंदी ट्रान्सलेटर' हे अ‍ॅप ऑफलाईन वापरता येतं. या अ‍ॅपमध्ये हिंदी की बोर्ड देण्यात आला आहे. यात शब्दकोशही आहे.

* 'हिंदी-इंग्रजी डिक्शनरी'च्या मदतीने तुम्ही इंग्रजीतल्या वाक्यांचा हिंदीत अनुवाद करू शकता. इंग्रजी शिकण्यासाठी यात काही गेम्सही आहेत.

## मौल्यवान सोने

**माहिती खनिजांची**

सोने हा पृथ्वीवरील सर्वात सुंदर आणि मौल्यवान धातू मानला जातो. सोने पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या अनेक मीटर खाली आढळते. सोने जमिनीतून काढण्यासाठी आधी खडक फोडावे लागतात. त्या खडकात सोन्याचे अगदी छोटे कण असतात. खडकाची पावडर करून त्यावर पाणी सोडतात. सोने जड असल्यामुळे खाली बसते. याला 'पॅनिंग' किंवा धुण्याची पद्धत म्हणतात. मोठ्या खाणींमध्ये मशीनने खडक वेगळे करतात आणि रसायनांच्या मदतीने सोन्याचे कण वेगळे केले जातात. मिळालेले सोने पूर्ण शुद्ध नसते. त्यात चांदीसह अनेक इतर धातू मिसळलेले असतात. मिलमध्ये मोठे खडक आधी चिरडले जातात आणि नंतर पुन्हा पुन्हा फोडून बारीक पूड केली जाते. त्यात पाणी आणि सायनाईड मिसळून त्याचे



एक पातळ मिश्रण तयार केले जाते. हे मिश्रण मोठ्या टाक्यांमध्ये सोडले जाते. या चिखलातील जड कण खाली बसतात आणि द्रवापासून वेगळे केले जातात. ही द्रव सामग्री बाहेर काढली जाते आणि फिरणाऱ्या गोलाकार सिलिंडरवर सोडली जाते. मिश्रण पसरून हळूहळू बाष्पीभवन होते. त्यानंतर रसायनांच्या मदतीने अशुद्धता काढली जाते. शुद्ध सोने मिळवण्यासाठी ते अत्यंत उच्च तापमानावर तापवावे लागते. या सगळ्या प्रक्रियेनंतर उरलेले चमकदार सोने त्यापासून बार, नाणे किंवा दागिने बनवण्यासाठी वापरता येते. चांगल्या सोन्याच्या खाणीमधल्या १,००० किलो खडकाच्या पावडरमधून साधारण ६.५ ग्रॅम सोने मिळू शकते. भारतामध्ये सोने प्रामुख्याने कर्नाटक, आंध्र प्रदेश, झारखंड आणि राजस्थान या ठिकाणी मिळते. कर्नाटकातील कोलारमध्ये सध्या उत्खनन थांबले आहे. तसेच हिमालयाच्या काही भागात नद्यांमध्येही सोन्याचे लहान कण आढळतात.सोने खूप टिकाऊ असते. हवा, पाणी किंवा वेळ यामुळे त्याला गंज किंवा डाग लागत नाहीत.

## सांताक्लॉजची नवी गाडी

**डेन्मार्कची लोककथा**

डेन्मार्कमधील क्रॅनॅक नावाच्या छोट्या बर्फाच्या शहरात एक दयाळू आजोबा राहत होते. ख्रिसमसच्या दिवशी सगळ्या शहाण्या मुलांना खाऊ आणि खेळणी नेऊन द्यायचे काम देवाने त्याच्याकडे दिले होते. लोक त्यांना सांता म्हणत. एका ख्रिसमसच्या रात्री सांताने आपली जादूची थैली भरली आणि ते निघाले. सांता गाडीत बसले. गाडीच्या घंट्या टुणटुण वाजल्या. पण गाडी हललीच नाही. सांता आजोबांनी खूप प्रयत्न केला. पण गाडी हलेना. आता सगळे काम कसे पूर्ण होणार याची त्यांना काळजी वाटू लागली. तेवढ्यात बर्फातून एक लहानसा निळा ढग खाली उतरला. त्याला दोन चमकदार डोळे आणि छोट्या पंखासारखी वाऱ्याची



पिसे होती. ढग म्हणाला, 'मी आहे विंडी. जादूचा ढग. माझ्या जादूच्या शक्तीने मी तुमची गाडी बदलून देतो!' विंडीने हळूच गाडीवर फुंकर मारली. सांतासमोर नवी जादूची गाडी उभी राहिली. या गाडीला घंटी नव्हती. पण तिच्या हॅंडलवर एक स्नोबनचा हसरा चेहरा होता. आकाशातले ढगांचे खड्डे आले की तो स्नोबन खुदुखुदू हसायचा. सांता म्हणाले, 'मला जगभर फिरायचे आहे आणि ते देखील एका रात्रीत.' विंडीने लहान लहान आठ चांदण्या घेतल्या. त्यांच्यावर हळूच फुंकर मारली. त्यांचे आठ रेनडिअर तयार झाले. 'हे आहेत जादूचे रेनडिअर. डॅशर, डान्सर, प्रान्सर, व्हिक्सन, कॉमेट, क्युपिड, डॉन्नर आणि ब्लिट्झन. हे आकाशात उडू शकतात आणि जमिनीवर पण धावू शकतात. हे वाऱ्या सारखे वेगवान आहेत. मुलांना खाऊ आणि खेळणी वाटायचे तुमचे काम आता लगेच पूर्ण होईल. 'सांताने गाडी सुरू केली. रेनडिअर्सनी आकाशात झेप घेतली. गाडी आकाशात उडायला लागली. स्नो बन हसू लागला. सांता आपली गाडी त्या घराच्या छपरावर ठेवत. तिथल्या धुराडयातून हळूच खाली उतरत. मुलांच्या उशापाशी लटकावलेल्या मोज्यात सांता खाऊ आणि खेळणी ठेवत आणि आले तसेच गुपचुप बाहेर पडत. नव्या गाडीमुळे सांताचे काम चंद्र मावळायच्या आधीच पूर्ण झाले. तेव्हापासून सांता त्याच्या नव्या गमतीदार गाडीतून सगळीकडे फिरु लागले.

## सेफ्टी मॅनेजमेंटमधील संधी

**कोण होणार?**

दोस्तांनो, आपलं आयुष्य खूप धोक्याचं आणि असुरक्षित झालं आहे. घर असो रस्ता असो किंवा मग कामाचं ठिकाण, आपल्याला अनेक धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यातच औद्योगिक क्षेत्रात अनेक अपघात होतात.




हे अपघात टाळण्यासाठी सरकारने औद्योगिक क्षेत्रासाठी काही नियम आणि कायदे केले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा अधिकारी नेमणं बंधनकारक आहे. म्हणूनच सेफ्टी मॅनेजमेंट हे उत्तम करीअर होऊ शकतं. बारावी किंवा पदवीनंतर सेफ्टी मॅनेजमेंट विषयक अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. आरोग्य विज्ञान, औद्योगिक सुरक्षाविषयक नियम, अपघात थांबवण्यासाठीच्या उपाययोजना असे विषय या अभ्यासक्रमाअंतर्गत शिकवले जातात. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी मेहनतीची तयारी, संवादकौशल्य, धैर्य, संयम, निर्णयक्षमता, प्रसंगावधान अशा कौशल्यांची गरज असते.

अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खाजगी तसंच सरकारी क्षेत्रात करीअर करता येतं. या पदाला खूप मान असतो. उद्योग, कारखान्याच्या सुरक्षेची जबाबदारी या अधिकाऱ्यावर असते. बीएससी इन सेफ्टी मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स इन फायर अँड सेफ्टी मॅनेजमेंट, सर्टिफिकेट कोर्स इन फायर टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम तुम्ही निवडू शकता. अंगात धाडस असेल तर करीअरचा हा मार्ग स्वीकारायला हरकत नाही.

## रॉकी पर्वतरांगा

**ओळख पर्वतांची**

रॉकी पर्वतरांग ही कॅनडा आणि अमेरिका या दोन देशांत पसरलेली सर्वात प्रसिद्ध आणि विशाल पर्वतरांग आहे. ती साधारण ४८०० किलोमीटर लांबीची आहे. कॅनडामध्ये ती अल्बर्टा आणि ब्रिटीश कोलंबिया या प्रांतांतून तर अमेरिकेत कोलोराडो, वायोमिंग, मॉन्टाना, आयडाहो आणि न्यू मेक्सिको या राज्यांतून ही रांग पुढे पसरते.

इथली उंच शिखरे खूपच प्रसिद्ध आहेत. त्यात अमेरिकेतील माउंट एल्बर्ट, कॅनडातील माउंट रॉबसन, लोंग्स पीक, पाइक्स पीक अशी अनेक उंच शिखरे येतात. येथील हवामान उंचीप्रमाणे बदलते. वरच्या उंच भागात बर्फ आणि खाली हिरवीगार अरण्ये आढळतात.

रॉकी पर्वतरांगेत अनेक सुंदर नद्या उगम पावतात. त्यात कोलोराडो नदी, कोलंबिया नदी, रिओ ग्रांदे, स्नेक नदी, मिसूरी नदी या अत्यंत महत्त्वाच्या नद्या येतात. तसेच रॉकी माउंटन नॅशनल पार्कमधील बेअर लेक, कॅनडातील लेक लुईस आणि मोराइन लेक हे मोठे तलावही प्रसिद्ध आहेत. खालच्या भागात पाईन, फर, स्प्रूस, सिडार, ओक, अ‍ॅनस्पन अशी भरपूर झाडे आहेत. उंच भागात बर्फ सहन करणारी टोकदार पानांची झाडे आढळतात. उन्हाळ्यात ही अरण्ये हिरवीगार दिसतात आणि शरद ऋतूमध्ये ऑस्पनची पिवळी पाने संपूर्ण पर्वत सोनेरी करतात. रॉकी पर्वतरांगेत अनेक वन्य प्राणीही राहतात. ग्रिझली अस्वल, काळी अस्वले, मूस, एल्क, पर्वतीय शेळ्या, लांडगे, कोल्हे आणि गरुड इथे दिसतात. उंच भागात छोटे पिका नावाचे बर्फात राहणारे प्राणीही आढळतात.

प्राचीन काळापासून काही आदिवासी जमाती इथे राहतात. त्यात शायेन, अ‍ॅछपाची, ब्लॅकफूट, यूट, क्रो, नझ पर्स अशा जमातींचा समावेश होतो. ते निसर्गाशी जुळवून जीवन जगतात आणि पर्वत, नद्या व प्राण्यांना पवित्र मानतात.

## बनवा तुमची स्टिरिओ सिस्टिम

**कार्यानुभव**

तुमच्या लहान बहिणीला तुम्हाला काहीतरी द्यायचंय. काही तरी स्पेशल. स्वत: बनवलेलं. पण काय द्यावं हे सुचत नाहीये. मग एक सोपी आणि मस्त आयडिया आहे. घरातल्याच काही वस्तू वापरून तुम्ही एक स्टिरिओ सिस्टीम तयार करू शकता. तुमच्या बहिणीच्या भातुकलीसाठी किंवा डॉलहाऊससाठी ही एक छान भेट ठरेल.

**साहित्य** : चार रिकाम्या काडेपेट्या, एक मोठ्या आकाराची रिकामी काडेपेटी किंवा पुठ्ठ्याचा खोका, काळं स्केच पेन, करड्या (ग्रे) रंगाचा चार्ट पेपर, अ‍ॅल्युमिनिअम फॉइल, कात्री आणि गम

**कृती** :


* चार छोट्या काडेपेट्यांच्या दोन दोनच्या जोड्या करून एकावर एक आडव्या चिकटवा. या काडेपेट्यांवर ग्रे कागद गुंडाळा. हे तुमच्या स्टिरिओ सिस्टीमचे स्पीकर्स असतील.

* मोठ्या काडेपेटीवरही ग्रे कागद गुंडाळा. हा तुमच्या स्टिरिओचा डेक असेल.

* स्पीकर्सच्या बाहेरच्या बाजूला उजव्या आणि डाव्या कोपऱ्यात काळ्या स्केच पेननी दोन छोटी वर्तुळं काढा. * मग अ‍ॅल्युमिनिअम फॉइलवर एक छोटं आणि मोठं वर्तुळ काढा आणि तो भाग कापून घ्या. या दोन वर्तुळांपैकी छोटं वर्तुळ स्पीकरच्या वरच्या बाजूला आणि मोठं खालच्या बाजूला लावा. अशाप्रकारे दोन्ही स्पीकर्सना वर्तुळं चिकटवून घ्या. * मोठी काडेपेटी हा तुमचा मुख्य डेक. त्यावर काळ्या स्केचपेनने रेडिओच्या खुणा करा. तसंच कॅसेट प्लेअरचं चित्र काढून घ्या. सीडी प्लेअरचं चित्रही तुम्ही काढू शकता. तुमच्या घरचा डेक बघून तुम्ही हा खेळण्यातला डेक तयार करू शकता. *शेवटी मुख्य डेकला स्पीकर्स चिकटवा. झाली तुमची स्टिरिओ सिस्टिम तयार. आता ही छानशी भेट तुमच्या छोट्या बहिणीला द्या.



**ठिपके जुळवा**



## 'एफ' कीजची कमाल

**स्मार्ट टिप्स**




मित्रांनो, तुम्ही कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप वापरत असाल. तुमच्या कॉम्प्युटरवर वरच्या बाजूला एफ १ ते एफ १२ या की असतात. हा कीज कशासाठी असतील, असा प्रश्न तुम्हाला पडत असेल. या एफ कीजचं नेमकं काम काय, याविषयी जाणून घेऊया...

* एखाद्या प्रोग्राममध्ये काम करत असताना मदत हवी असेल तर एफ १ ही की वापरता येईल. ही की दाबल्यावर 'हेल्प' विंडो ओपन होईल.

* एखाद्या फाईल किंवा फोल्डरचं नाव बदलायचं असेल तर ते सिलेक्ट करून एफ २ की दाबा. आता तुम्ही फाईलचं नाव बदलू शकता.

* कोणत्याही अ‍ॅपमध्ये सर्च ऑप्शन ओपन करण्यासाठी तुम्ही एफ ३ ही की वापरू शकता.

* एखादी विंडो बंद करायची असेल तर आल्ट प्लस एफ ४ ही की दाबा.

* विंडो किंवा प्रोग्राम रिफ्रेश करण्यासाठी एफ ५ की दाबा.

* तुम्हाला इंटरनेट ब्राउजरच्या अ‍ॅड्रेस बारमध्ये कर्सर न्यायचा असेल तर एफ ६ ही की वापरा.


* वर्डमध्ये काम करत असताना स्पेलिंग तसंच व्याकरण तपासायचं असेल तर एफ ७ ही की वापरा. कॉम्प्युटर ऑन करताना 'बूट' मेनूमध्ये जायचं असेल तर एफ ८ ही की दाबा.

* वर्ड डॉक्युमेंट रिफ्रेश करण्यासाठी एफ ९ कीचा वापर करता येईल.

* अ‍ॅपमधला मेनू बार ओपन करण्यासाठी एफ १० की वापरा.

* ब्राउजर फुल स्क्रीन करण्यासाठी किंवा त्यातून बाहेर पडण्यासाठी एफ ११ या कीचा वापर करता येईल.


* वर्डमध्ये काम करत असताना सेव्ह अ‍ॅज डायलॉग बॉक्स ओपन करण्यासाठी एफ १२ की दाबा.




## ऐटबाज हत्ती

**करून तर पहा**

दोस्तांनो, तुम्ही छानसा हत्ती घरच्या घरी तयार करू शकता.



**साहित्य** : पातळ पुठ्ठा, कपड्याला लावायच्या पाच पिना, पाईप क्लिनर्स, गम, सजावटीच्या वस्तू, रंग

**कृती** : पुठ्ठ्यावर हत्तीचा आकार काढा. तसंच बदामाचा मोठा आकार त्याच पुठ्ठ्यावर काढा. बदामाचा आकार म्हणजे हत्तीचे कान आहेत हे लक्षात घ्या. यासाठी घरातल्या पुठ्ठ्याच्या बॉक्सचा वापर करता येईल. हत्ती आणि बदामाचा आकार कापून घ्या. बदामाच्या आकाराच्या मधोमध चीर द्या. या हत्तीच्या सोंडेच्या खालच्या बाजूला अशीच चीर द्या. आता हत्तीच्या शरीराला तुमच्या आवडीचा रंग द्या. कान तसंच चार पिनाही रंगवून घ्या. पाचव्या पिनेचा अर्धा भाग लाल रंगाने रंगवा तर अर्ध्या भागाचा रंग पिच असेल. हत्तीच्या पाठीवर झूल घाला. त्यासाठी एखादं कापड वापरता येईल. ग्लिटर पेन, खडे, स्टिकर्सचा वापर करून तुम्ही हत्ती सजवू शकता. तुमच्याकडे ज्या पिना आहेत त्यांच्यापासून हत्तीवर बसणारा राजा साकारायचा आहे. पिनांवर पाईक क्लिनर गुंडाळायचा आहे. राजाचे हात आणि पाय दिसतील अशा प्रकारे पाईप क्लिनर गुंडाळा. तसंच पिनेच्या वरच्या बाजूलाही पाईक क्लिनर गुंडाळा. हा पाईप क्लिनर म्हणजे राजाचा फेटा. हत्तीच्या शरीरावर आपण चीर दिली होती. तसंच बदामालाही चीर दिली होती. शरीराच्या चिरेत बदाम अडकवा. हे हत्तीचे कान आहेत. डोळ्यांचा आकार काढा किंवा गुगली आईज चिकटवता येतील. झाला तुमचा हत्ती तयार.

**पर्सनल केअर**

### कशी स्वच्छ करायची पाण्याची बाटली?

दोस्तांनो, आपल्या पाण्याच्या बाटलीत खूप बॅक्टेरिया असतात. बाटली नीट स्वच्छ केली नाही तर या बॅक्टेरियांमुळे आपण आजारी पडू शकतो. त्यामुळे शाळेत नेण्याची तुमची बाटली स्वच्छ असली पाहिजे. प्लास्टिकच्या बाटलीत सर्वात जास्त जंतू असतात. त्यामुळे



ही बाटली आधी साबणाने स्वच्छ धुवून घ्यायला हवी. यामुळे बाटलीला येणारा वास निघून जाईल. वास गेला नाही तर चमचाभर ब्लीच आणि बेकिंग सोडा घालून बाटली स्वच्छ करा. ब्लीच आणि बेकिंग सोडा रात्रभर बाटलीत घालून ठेवा. त्यात पाणी भरा. सकाळी हलवून स्वच्छ करा.

**सेफ्टी टिप्स...**

### कसं राहायचं सुरक्षित?

सध्या लहान मुलांसोबत घडणाऱ्या गुन्ह्यांमध्ये खूप वाढ झाली आहे. त्यामुळे शाळेत किंवा घराबाहेर पडल्यावर विशेष काळजी घ्यायला हवी.



लहान मुलांनी शक्यतो एकटं कुठेही जाऊनये. सोबत कोणाला तरी न्यायला हवं. अनोळखी माणसांशी बोलू नये. त्यांच्याकडून चॉकलेट, आईस्क्रीम किंवा कोणताही खाद्यपदार्थ घेऊनये. त्यांच्यासोबत कुठेही जाऊनये. शरीराला कोणी चुकीच्या पद्धतीने स्पर्श करत असेल तर आई-बाबांना लगेच सांगायला हवं. थोडी काळजी घेतली तर आपण नक्कीच सुरक्षित राहू शकू.

**बी अ‍ॅलर्ट**

### टॅटू काढण्याआधी...


मित्रांनो, आजकाल अनेक ठिकाणी टॅटू काढून मिळतात. टॅटू काढणारे रस्त्यांवरही असतात. पण टॅटू काढून घेताना सुरक्षेची काळजी घ्यायला हवी. टॅटूमुळे शरीरावर फोड किंवा अ‍ॅलर्जी होणार नाही हे पहायला हवं. इजिप्तमध्ये अशीच एक घटना घडली. एका सात वर्षांच्या मुलीने टॅटू काढून



घेतला. पण हे प्रकरण तिला भलतंच महागात पडलं. तिच्या हातांवर पुरळ उठलं. फोड आले. टॅटू बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये घातक रसायनं असू शकतात. या रसायनांमुळे तुमच्या कोमल त्वचेला त्रास होऊ शकतो. त्यामुळे टॅटू काढण्याआधी सावध व्हा.

**खादाडी**

### फन फ्रूट कबाब्ज



मित्रांनो, नवरात्रीमध्ये अनेकांचे उपवास असतात. तुमच्या घरातही आई-बाबांचा उपवास असेल तर ही मस्त रेसिपी बनवता येईल. ही रेसिपी बनवण्यासाठी एक सफरचंद, एक केळं, लाल आणि हिरवी द्राक्षं, अननसाचे तुकडे, योगर्ट आणि किसलेलं सुकं खोबरं असं साहित्य घ्या. सगळी फळं नीट धुवून घ्या. त्यांचे छोटे चौकोन कापा. केळ्यांचे गोल आकार कापा. मोठ्या ताटलीत सगळी फळं ठेवा. किसलेलं खोबरं एका ताटलीत ठेवा. बारीक काठी घ्या. आईस्क्रीमच्या काड्या चालतील. या काडीत सगळी फळं अडकवा. तुमच्या कल्पनेप्रमाणे डिझाइन करा. आता काठीत अडकवलेली फळं योगर्टमध्ये बुडवा. आता ही फळं किसलेल्या खोबऱ्यावरून फिरवा. मस्तपैकी खा.

## जहाल नक्षल कमांडर
# बारसे देवा शरण

■ **महासागर प्रतिनिधी**
**गडचिरोली, दि. २ :**



नक्षलवाद्यांविरुद्धच्या लढाईत सुरक्षा दलांना नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच मोठे यश मिळाले असून हिडमानंतर छत्तीसगडमधील नक्षली चळवळीचा कणा मानला जाणारा जहाल कमांडर बारसे देवा उर्फ सुक्का याने तेलंगणा पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे.

दरभा डिव्हिजनल कमिटीचा सचिव असलेल्या देवावर शासनाने ५० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. कुख्यात नक्षलवादी माडवी हिडमाच्या खात्म्यानंतर नक्षल संघटनेची मोठी पीछेहाट झाली आहे.

काही दिवसांपूर्वी आंध्र प्रदेश पोलिसांनी केलेल्या कारवाईत जहाल नक्षलवादी माडवी हिडमा मारला गेला होता. हिडमाच्या मृत्यूमुळे नक्षली गटांमध्ये कमालीची अस्वस्थता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.
तेव्हापासूनच बारसे देवा सुरक्षा दलांच्या रडारवर होता. केंद्र सरकारचे ऑपरेशन कगारह्र आणि पोलिसांचा वाढता दबाव यामुळे अखेर बारसे देवाने मध्यस्थांमार्फत चार राज्यांच्या पोलिसांशी संपर्क साधला आणि १ जानेवारी रोजी रात्री तेलंगणातील कोठगुडेम जिल्हा पोलिसांसमोर शरणागती पत्करली.

बारसे देवा हा मूळचा छत्तीसगडच्या पुवर्ती गावचा रहिवासी असून पीएलजीएच्या पहिल्या बटालियनचा कमांडर म्हणून त्याने अनेक वर्षे काम केले आहे. छत्तीसगडमध्ये सीआरपीएफ जवानांवर झालेल्या अनेक प्राणघातक हल्ल्यांमध्ये त्याचा थेट सहभाग होता. हिडमा सेंट्रल कमिटीत गेल्यानंतर त्याच्या सर्व जबाबदाऱ्या देवाने सांभाळल्या होत्या. नक्षलवादी चळवळीतील अंतर्गत माहिती आणि धोरणांचा तो मुख्य सूत्रधार असल्याने, त्याच्या आत्मसमर्पणानंतर चळवळीची अनेक गोपनीय माहिती पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. हिडमाच्या मृत्यूनंतर नक्षली नेतृत्वाला बसलेला हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे.

# भाजपच्या इशाऱ्यावरूनच काँग्रेसने आघाडी तोडली

## अनिल देशमुख यांचा दावा



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १ :**
महापालिका निवडणुकीसाठी नागपुरात काँग्रेस आणि राष्ट्रवादीशी झालेली आघाडी काँग्रेसने भाजपच्या इशाऱ्यावरून ऐनवेळी तोडली, असा दावा माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नेते अनिल देशमुख यांनी केला.

आगामी नागपूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये तीव्र मतभेद उफाळून आले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (शरदचंद्र पवार) काँग्रेसवर गंभीर आरोप केले आहे. परस्पर संमतीने जागा वाटपाचे सूत्र निश्चित होऊनही काँग्रेसने ऐन शेवटच्या क्षणी युती तोडत भाजपला अप्रत्यक्ष फायदा पोहोचवला, असा आरोप देशमुख यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेस यांच्यात नागपूर महापालिका निवडणुकीसाठी दीर्घकाळ चर्चा सुरू होती.

दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपावर तत्त्वतः सहमती झाली होती. कोणत्या प्रभागात कोणता पक्ष उमेदवार उभा करणार, याचा सविस्तर ह्यफॉर्म्युलाह्नही निश्चित करण्यात आला होता. मात्र, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी काँग्रेसकडून कोणताही स्पष्ट प्रतिसाद मिळाला नाही, असा आरोपही त्यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार, रात्री सुमारे ३ वाजता कोणतीही पूर्वसूचना न देता काँग्रेसने राष्ट्रवादीसाठी सोडलेल्या जागांवर स्वतःच्या उमेदवारांना बी फॉर्म दिले. यामुळे आधीच ठरलेला आघाडीचा करार पूर्णपणे मोडीत निघाला. या प्रकारामुळे आघाडीतील विश्वासाला तडा गेला असून भाजपला थेट लाभ होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

या घडामोडींनंतर राष्ट्रवादीने स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. पक्षाच्या वतीने नागपूर महापालिकेच्या निवडणुकीसाठी एकूण ७९ उमेदवारांना तिकीट देण्यात आले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाच्या सर्व उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केली असून, शहरातील विविध प्रभागांमध्ये जनतेचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचा दावा पक्षाकडून करण्यात आला आहे.

## सहायक वन संरक्षकासह लिपिकाला
# लाच घेताना अटक

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १ :**
शेतातील झाडांची कटाई, वाहतूक व विक्रीचा व्यवसाय सुरळीत सुरू ठेवण्यासाठी ३० हजार रुपयांची वार्षिक लाच मागणाऱ्या आणि १५ हजाराची लाच स्वीकारणाऱ्या वनविभागाच्या सहायक वनसंरक्षक (वर्ग १) व त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली.

अश्विनी वसंत आपेट (वय ३५), सहायक वनसंरक्षक (वर्ग-१) व अमोल वसंत मोरे (वय ३८), कनिष्ठ लिपिक (वर्ग-३), अशी आरोपींची नावे आहे. तक्रारदार हे शेतातील झाडांची खरेदी करून त्यांची कटाई, वाहतूक व लाकूड विक्री करतात. सहायक वनसंरक्षक श्रीमती आपेट व त्यांचे कार्यालयातील लिपिक अमोल मोरे यांनी ३०,००० रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा येथे प्राप्त झाली होती. तडजोडीनंतर १५ हजारांचा पहिला हप्ता देण्याचे ठरले. आज ही लाच घेताना दोघांनाही अटक करण्यात आली.

# मागील वर्षात देशात १६६ वाघांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, जगातील जवळपास तीन-चतुर्थांश वाघांचे घर असलेल्या भारतात, २०२५ मध्ये तब्बल १६६ वाघांचा मृत्यू झाला. २०२४ च्या तुलनेत ही संख्या ४० ने वाढली आहे.

मध्यप्रदेशात सर्वाधिक ५५ मृत्यूंची नोंद झाली, तर इतर प्रमुख मृत्यू महाराष्ट्र ४०, केरळ १३ आणि आसाम १२ वाघांचे मृत्यू नोंदवले गेले. देशभरात मृत्यू झालेल्या एकूण वाघांपैकी ३१ बछडे होते. यापैकी बहुतेक मृत्यूंमागे प्रादेशिक संघर्ष हे एक प्रमुख कारण म्हणून समोर येत आहे. जागेच्या कमतरतेमुळे होणारी प्रादेशिक भांडणे हे वाघांच्या मृत्यूमागील प्रमुख कारणांपैकी एक आहे. वाघांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे अधिवासाची आव्हानेही निर्माण झाली आहेत.

राज्यातील वाघांच्या संख्येत २०१४ पासून २०२२ पर्यंत ७० टक्क्यांनी वाढ झाली. या जलद वाढीमुळे स्पर्धा तीव्र झाली आहे. २०२५ मधील पहिला वाघाचा मृत्यू २ जानेवारीला महाराष्ट्रातील ब्रह्मपुरी वनविभागात नोंदवला गेला, जिथे एका प्रौढ नर वाघाचा मृतदेह आढळला. त्यानंतर, तीन दिवसांनी मध्य प्रदेशातील पेंच व्याघ्र



प्रकल्पात एका प्रौढ मादी वाघाचा मृत्यू झाला.

वाघाच्या मृत्यूची शेवटची नोंद २८ डिसेंबरला मध्यप्रदेशातील उत्तर सागर येथे आढळलेल्या एका प्रौढ नर वाघाच्या स्वरूपात झाली. बहुतांश मृत्यू हे संरक्षित क्षेत्राव्यतिरिक्त बाहेर झाले आहेत तर अनेक मृत्यू हे संशयासपद, शिकार यातून झाले आहेत.

**: साप्ताहिक संवाद :**
# अर्थव्यवस्था मजबूत



लोकरंग

मागील काही महिन्यापासून जागतिक स्तरावर अर्थजगतात अस्थिर आणि प्रतिकूल असे वातावरण आहे. मात्र याच पार्श्वभूमीवर देशांतर्गत वस्तू उपभोग आणि गुंतवणुकीतील वाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्था हि आगामी काळात देखील मजबूत असणार आहे असे भारतीय अर्थ जगताचे संकेत आहेत. याच पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्थेच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**जागतिक स्तरावरील अस्थिर अर्थव्यवस्थेच्या पार्शवभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती काय आहे?**

■ रिझर्व बँकेच्या वतीने नुकताच वित्तीय स्थिरता अहवाल प्रकशित केला गेला आहे. यानुसार देशांतर्गत वस्तू उपभोग आणि गुंतवणुकीतील वाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्था हि आगामी काळात देखील सक्षम आणि मजबूत असणार आहे. रिझर्व्ह बँकेचे केवळ आर्थिक स्थिरता राखणे हेच भविष्यात ध्येय नसून नावीन्य आणि विकासाला चालना देणे, ग्राहकांचे संरक्षण करणे,आणि नियम व देखरेखीसाठी व्यावहारिक दृष्टिकोन ठेवणे हि देखील उद्दिष्ट आहेत.

**भारतीय अर्थव्यवस्था स्थिरतेला भक्कम आधार कोणता आहे?**

■ जागतिक अर्थ व्यवस्थेच्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था मात्र सक्षम आणि मजबूत आहे कारण या अर्थव्यवस्थेला भक्कम विकासदर आटोक्यात असलेली महागाई, वित्तीय आणि बिगर वित्तीय व्यवस्थेचे सुदृढ आर्थिक ताळेबंद आणि सरकारच्या धोरणात्मक सुधारणांचा आधार आहे.

भविष्यात बाह्य जगातील अस्थिरतेमुळे काही आव्हान निर्माण होऊ शकतील,मात्र संभाव्य धोक्यांपासून अर्थव्यवस्था संरक्षित करण्यासाठी रिझर्व्ह बँक मजबूत सुरक्षा यंत्रणा तयार करेल.

**भारतीय अर्थव्यवस्थेला स्टेबल कॉईन्सचा संभाव्य धोका आहे का?**

■ स्टेबलकॉईन्स चा मोठ्या प्रमाणावर वापर देशाचे चलनविषयक सार्वभौमत्व आणि वित्तीय स्थिरतेसाठी गंभीर धोका निर्माण करू शकतो. स्टेबलकॉईन्समध्ये असलेल्या अंगभूत उणिवेमुळे वित्तीय स्थिरतेसाठी मोठे धोके निर्माण होऊ शकतात.

वैध चालनावरील विश्वास हाच वित्तीय स्थिरता टिकवून ठेवण्याचा पाया आहे. परकीय चलनात मूल्य असलेल्या स्टेबल कॉईन्सचा वापर वाढल्यास देशांतर्गत चलनविषयक धोरणावरचे नियंत्रण कमकुवत होऊ शकते.
■ ■ ■

# पटियालाची राजेशाही परंपरा



पंजाब म्हटलं की डोळ्यासमोर मोहरीची शेते, गिद्दा आणि भांगडा नृत्य उभं राहतं. पण पंजाब म्हणजे फक्त इतकंच नाही. पंजाब हे इतिहास, संस्कृती, धर्म आणि निसर्गाचे एक अद्भुत मिश्रण आहे. या राज्याच्या सौंदर्यामुळे इथे एकदा आलेला माणूस पुन्हा-पुन्हा येण्याची इच्छा ठेवतो.

सुवर्ण मंदिर हे केवळ शिखांचे प्रमुख तीर्थस्थळ नाही, तर जगातील सर्वात शांत आणि आध्यात्मिक ठिकाणांपैकी एक आहे. येथील पवित्र सरोवर, संगमरवरी वास्तुकला आणि २४ तास चालणारे लंगर (मोफत भोजन) जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.
भारत-पाकिस्तान सीमेवर होणारी बीटिंग रिट्रीट सेरेमनी एक रोमांचकारी अनुभव आहे. देशभक्तीचा जोश, गर्दी आणि सैनिकांची गर्वाने भरलेली चाल परदेशी पर्यटकांनाही भारावून टाकते. पंजाबच्या रूपनगर जिल्ह्यात असलेले हे ठिकाण शिख धर्माचे जन्मस्थान मानले जाते. तख्त श्री केसगढ साहिब आणि वार्षिक ह्यहोला मोहल्ला सण इथे खूप प्रसिद्ध आहे. इथे होणारे घोडेस्वारी आणि मार्शल आर्टचे थेट प्रदर्शन परदेशी पर्यटकांना आकर्षित करते.

पटियालाची राजेशाही परंपरा, रंगीत बाजार आणि संगीताची परंपरा पर्यटकांना वेगळा अनुभव देतात. इथला किला मुबारक आणि बरदारी गार्डन पाहण्यासारखे आहेत.

पटियाला सूट आणि पटियाला पेगसारखे शब्द इथूनच लोकप्रिय झाले आहेत. या शहराला आधी रोपड म्हणून ओळखले जायचे. हे शहर सिंधू संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. इथलं रोपड पुरातत्व संग्रहालय आणि सतलज नदीचा किनारा पक्षीप्रेमींसाठी स्वर्ग मानला जातो. ■ ■ ■

## वेध प्राणी विश्वाचा
# चपळ गोम



गोम हा प्राणी संधिपाद संघाच्या अयुतपाद (मिरिॲपोडा) वर्गातील आहे. जगातील सगळ्या उष्ण आणि समशीतोष्ण प्रदेशांत हा आढळतो. बहुतेक गोमा भूचर असून दिवसा जमिनीच्या, दगडधोंड्यांच्या किंवा पालापाचोळ्यांच्या खाली, खडकाच्या भेगांत किंवा घरामध्ये काळोखी तळघर व स्नानगृह अशा ठिकाणी दमट कोपऱ्यात राहतात. रात्री त्या भक्ष्य शोधण्याकरिता बाहेर पडतात. काही जातीच्या गोमा ओहोटीच्या वेळी उघड्या पडणाऱ्या सागरकिनारपट्टीवरील सागरी वनस्पती, दगड, रिकामे शंख आणि कृमींच्या नळ्या यांमध्ये आढळून येतात.
गोमेची लांबी २.५-१५ सेंमी. असते. शरीर चपटे आणि खंडांनी बनलेले असते. या खंडांची संख्या १५-१८० पर्यंत असू शकते. दक्षिण अमेरिकेत आढळणा-या स्कोलोपेंड्रा जायगेंटी ही गोम २० सेंमी. पर्यंत लांब असते. शरीराचे डोके आणि धड असे दोन स्पष्ट भाग असतात. डोक्यावर लांब स्पर्शेंद्रियाची एक जोडी (स्पृशा), चर्वणाकरिता दंतूर जंभांची (भक्ष्याचे तुकडे करण्याकरिता असणाऱ्या संरचनांची) एक जोडी आणि मुखाकडे अन्न नेण्याकरिता जंभांच्या मागे असणाऱ्या उपांगांच्या म्हणजे जंभिकांच्या दोन जोड्या असतात. धडाचा पहिला खंड आणि शेवटचे दोन खंड वगळून प्रत्येक खंडावर पायांची एक जोडी असते. प्रत्येक खंडावर श्वासरंध्रांची एक जोडी असते. काही गोमांना डोळे नसतात.
याखेरीज काहींमध्ये संयुक्त डोळे तर काहींमध्ये डोळ्यांसारखे बिंदू (नेत्रके) असतात. धडाच्या पहिल्या खंडावर एक पोकळ अशी चिमट्याच्या आकाराची विषारी नखांची जोडी असते. पकडलेल्या भक्ष्याच्या अंगात गोम तीक्ष्ण नखे खुपसून विषग्रंथीतील विष सोडते. लहान कीटक व कृमी हे गोमांचे भक्ष्य होय.
गोमेच्या दंशामुळे ताप, चक्कर व डोकेदुखी उद्भवते. मोठ्या गोमेच्या दंशामुळे लहान बालकांचा मृत्यू ओढविण्याचा धोका असतो. घरात आढळणारी व पायांच्या १५ जोड्या असणारी गोम विषारी नाही. उलट घरातील झुरळे, डास, कसर व ढेकूण यांसारख्या उपद्रवी कीटकांना खाऊन गोम माणसासाठी उपकारकच ठरते. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

## शिवाजी महाराजांच्या फोटोवर भाजपा नेत्याचे स्टिकर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या परीक्षेच्या पॅडवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोवर भाजप नेत्याच्या फोटोचे स्टिकर चिकटवण्यात आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे.
आमदार रोहित पवार यांनी यासंबंधीचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात पॅडवर भाजप नेते तथा विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांचा फोटो असल्याचे दिसून येत आहे. हे स्टिकर भाजप नेते तथा विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचे आहे. महिलेने ते स्टिकर काढल्यानंतर त्याच्या मागे छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो असल्याचे स्पष्ट होते. रोहित पवार यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

# निष्ठावंता तुला शोधू कुठे?

## डिजिटल चर्चासत्रात भाजपावर ताशेरे
### गुणवंत पाटील, डॉ. उज्वला दहिफळे, तौफिक नदाफ सह संदीप काळे यांचा सहभाग




महासागर स्पेशल एपिसोड

■ **स्वप्निल दुधारे, मुंबई, दि.१ :**
नुकत्याच उमेदवारी मिळण्याच्या कारणावरून महाराष्ट्रभरात गोंधळ पाहायला मिळाला आणि त्यातच निष्ठावंतांना डावल्यानंतर हेच कार्यकर्ते तुफान भडकले. पूर्वीच्या राजकारणात निष्ठावंत कार्यकर्ते घरची भाकरी बांधून एक विचारधारा घेऊन प्रचाराला उतरायचे. तेंव्हाचा कार्यकर्ता हा एक विचारधारा घेऊन निष्ठेने ज्या पक्षात जन्म झाला त्याच पक्षात मरायचा पण आता ते निष्ठावंत नुकत्याच तिकीट वाटप झाल्यानंतर संपले की काय असा प्रश्न उभा राहिला.

यालाच अनुसरून महासागर डिजिटल च्या माध्यमातून निष्ठावंता.. तुला शोधू कुठे? या विशेष चर्चा सत्राचा आयोजन करण्यात आलं होतं. या चर्चासत्रात ज्येष्ठ विचारवंत तथा राजकीय विश्लेषक गुणवंत पाटील हे दिल्लीवरून सहभागी झाले होते तर संभाजीनगर वरून भाजपाच्या महिला मोर्चाच्या अध्यक्षा डॉ.उज्वला दहिफळे यांचा सहभाग होता. त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते तथा संशोधक आणि पत्रकार तौफिक नदाफ यांच्यासह दैनिक महासागरचे मुख्य समूह संपादक संदीप काळे यांनीही आपली भूमिका ठामपणे मांडली. या कार्यक्रमाचे संचालन डिजिटलचे संपादक स्वप्निल दुधारे यांनी केलं.

या चर्चेदरम्यान गुणवंत पाटील यांनी भाजपाची विचारधारा पूर्णतः बदलून गेली असून त्यांना आता विचारधारेची काही लेणं- देणं नाही असा थेट आरोप केला तर उमेदवारांना तिकीट न मिळाल्यामुळे जे नाराजी नाट्य आणि जो संताप व्यक्त झाला त्या संदर्भात संदीप काळे यांच्या प्रश्नाला डॉक्टर उज्वला दहिफळे यांनी कार्यकर्त्यांना गृहीत धरून उत्तर दिलं की, कार्यकर्त्यांची नाराजी दोन ते तीन दिवसापूर्वी असते, आणि भाजपात एवढा मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश झाला की तिकीट देताना कार्यकर्ते नाराज झाले, कारण कमी जागेवर देखील हजारोच्या वर कार्यकर्त्यांनी फॉर्म भरला होता. उज्वला दहिफळे पुढे बोलताना म्हणाल्या की मलादेखील तिकीट नाकारलं पण मी नाराज नाही, उलट मी देवाचे आभार मानते की मला तिकीट नाकारलं पण मी पक्षाशी एकनिष्ठ आहे.

चर्चासत्रात बोलताना तौफिक नदाफ यांनी थेट भाजपावरती आरोप केला की मुस्लिम समाजाला भाजपा दुर्लक्षित करत आहे. त्याचबरोबर ठाकरे गटातील कार्यकर्ता अनेक कार्यकर्त्यांसह उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी बुथमध्ये जातो आणि भाजपाच्या कोट्यातून अर्ज करतो यावरून भाजपाची दडपशाही लक्षात येते असा थेट निशा नाही त्यांनी भाजपवर साधला.

संदीप काळे यांनी भाजपाची ही रणनीती भाजपालाच भोवणार असा आरोप करत निष्ठावंत कार्यकर्त्यांना नुसतं डावलच नाही तर त्यांना अक्षरशः पक्षाने तिकीट न देता त्यांच्या निष्ठेची परीक्षा घेतली. पुढे बोलताना संदीप काळे यांनी घोडा मैदान दूर नाही, असं सांगत येणाऱ्या निवडणुकीच्या निकालात भाजपाला फटका बसेल असा अंदाज ही वर्तवला.

पान १ वरून

## महाराष्ट्रात फक्त मराठीच...
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना त्यांनी भाषा वाद, राजकारण, मराठी संस्कृती आदी विविध विषयांना हात घालत महाराष्ट्रात केवळ मराठीचीच सक्ती असल्याचे स्पष्ट केले.

ते म्हणाले, आता नुकताच या ठिकाणी मावळत्या संमेलन अध्यक्षांनी नव्या अध्यक्षांना पदभार सोपवला. किती चांगला हा कार्यक्रम झाला. त्यांनी यांच्या हाती राज्य सोपवले. त्यांनी ते स्वीकारले. सर्वांनी टाळ्या वाजवल्या. असे राजकारणातही झाले तर किती चांगले होईल. किमान साहित्य क्षेत्रात तरी अजून होत आहे ही चांगली गोष्ट आहे. हे असेच होत रहावे अशी माझी अपेक्षा आहे.
मुख्यमंत्री पुढे म्हणाले, साताऱ्याने सर्वाधिक ६ साहित्य संमेलने भरवली. सर्वाधिक १७ अध्यक्षही साताऱ्यानेच दिले. म्हणजे विक्रमही आहे व पराक्रमही आहे. एका दुर्गाबाई भागवत म्हणाल्या होत्या की, आशय व विषय या दोन भिन्न गोष्टी आहेत. आपल्या लोकशाहीत जोपर्यंत ही गोष्ट लक्षात ठेवू विचारांची अभिव्यक्ती विचारांचे स्वातंत्र्य, साहित्य, परस्परविरोधी विचार, या सर्वांचा अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य जोपर्यंत आपण लोकशाहीत अबाधित ठेवू तोपर्यंत कुणी कितीही संविधानाला धोका आहे म्हटले तरी काहीही होणार नाही. हे संविधान एवढे मजबूत आहे की, काही होऊ शकत नाही. संविधानाने दिलेल्या विचारांच्या स्वातंत्र्याची कुणीही गळचेपी करू शकत नाही. ते अबाधितच राहणार आहे हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

## अण्णाभाऊ साठेंना....
आज एका शेतकऱ्याच्या मुलाला साहित्य संमेलनाचा अध्यक्ष केले ही एक मोठी गोष्ट आहे. विश्वास पाटील पुढे म्हणाले, स्वातंत्र्यवीर सावरकर ८७ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असताना लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या असे म्हणाले होते. त्यांचे हे वाक्य फार गाजले. पण त्यांनी पुढे जाऊन असेही सांगितले की, मातृभाषेत शिक्षण दिले पाहिजे. त्यावेळी त्यांनी माय मराठीचा पुरस्कार केला. त्यामुळे ज्या - ज्यावेळी मराठी भाषेवर संकट येते त्या - त्या वेळी आम्ही साहित्यिक लढा देतो. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मोरारजी देसाईंनी आमच्या आचार्य अत्रेंना ७० दिवस तुरुंगात टाकले होते. अण्णाभाऊ साठेंना हद्दपार केले होते.
कवीच्या हृदयातून आलेले सच्चे शब्द प्रसंगी सत्तेच्या सिंहासनासमोर झुकत नाहीत हे या साहित्यिकांनी दाखवून दिले आहे. मी अण्णाभाऊ साठे यांच्यावर बेसिक काम केले. त्यांना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे अशी आमची अनेक दिवसांपासूनची मागणी आहे. मराठी साहित्यातील दलित साहित्य हे वाखणण्याजोगे आहे, असेही विश्वास पाटील म्हणाले.

सध्या काळ वेगळा आहे. राजकीयदृष्ट्या नाजूक आहे. महापालिकेच्या निवडणुका आहेत. आचारसंहिता लागू आहे. पण तुमची आचारसंहिता असेल, तर आमची विचारसंहिता आहे. तुमच्या आचारसंहितेची मुदत २-३ आठवड्यांची किंवा महिन्याची असते. पण साहित्यिकांच्या लेखण्या व त्यातून निघालेले स्फुलिंग हे काही पिढ्यांचा प्रवास करतात. त्यामुळे या ठिकाणी संयुक्त महाराष्ट्रासाठी झटणाऱ्या एका कार्यकर्त्याच्या पुत्राला व आयुष्यभर शेती करणाऱ्या एका अशिक्षित शेतकरी मातेच्या पुत्राला तुम्ही पहिल्यांदा साहित्य संमेलनाचा अध्यक्ष केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो, असे विश्वास पाटील म्हणाले.

## दलित साहित्य भक्कम...
अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन आज (दि. २) डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.
मराठी साहित्याशी असलेले माझे भावनिक नाते कधीच ओसरलेले नाही तर काळाच्या ओघात ते अधिकच गडद होत गेले, असे सांगून डॉ. मृदुला गर्ग म्हणाल्या, मी वाचलेले पहिले मराठी पुस्तक म्हणजे शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय' ही कादंबरी. महाभारतातील 'कर्ण' हा माझा आवडता नायक असल्यामुळे हे पुस्तक वाचणे हा माझ्यासाठी अत्यंत भावूक आणि समृद्ध करणारा अनुभव ठरला. या नंतर छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील 'छावा' ही कादंबरी देखील मी वाचली. त्यानंतर ज्या लेखकाने माझ्या विचारांना पूर्णपणे कवेत घेतले, ते म्हणजे दलित साहित्यातील बंडखोर व्यक्ती नामदेव ढसाळ. तुमच्या कवितेत केवळ राग आणि विद्रोहच का असतो? या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले होते, माझे कार्य लास्याचे नव्हे तर तांडवाचे सूर आळवते. त्यांचे हे शब्द माझ्या मनात आणि हृदयात खोलवर रुजले. १९८० पासून मी त्यांचे साहित्य आणि त्यांच्याबद्दल सातत्याने वाचत आले आहे. त्यांच्या कवितांचा दिलीप चित्रे यांनी केलेला इंग्रजी अनुवाद अ करंट ऑफ ब्लड मी वाचला आहे. तो चळवळीतील सर्वच कर्त्यांसाठी 'बायबल' ठरला. त्यांच्या पत्नी मलिका अमर शेख या सुद्धा तितक्याच प्रतिभावंत लेखिका आणि दलित साहित्यातील पहिल्या महिला कवींपैकी एक आहेत.
उर्मिला पवार आणि शरणकुमार लिंबाळे यांसारख्या इतरही दिग्गज दलित लेखकांची आत्मचरित्रे मला भावली आहेत आणि त्यांना भेटण्याचा योगही आला आहे. एकाही स्त्री पात्राशिवाय असलेली भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी देखील मी वाचली आहे. त्या कादंबरीने मला अक्षरशः खिळवून ठेवले. लेखकाची सर्जनशीलता ही स्त्री-पुरुष असा भेद न करता प्रकट होऊ शकते हे मला यातूनच पटले.
शांतता, कोर्ट चालू आहे
त्या पुढे म्हणाल्या, १९९७ मध्ये ओमप्रकाश वाल्मिकींची 'जूठन', मोहनदास नैमिशराय यांची 'अपने-अपने पिंजरे' आणि तुळशीराम यांची 'मुर्दहिया' यांसारखी आत्मचरित्रे आली. दलित लेखकांच्या साहित्यकृतींमधून, आत्मचरित्रांमधून त्यांनी सहन केलेल्या अपार वेदना आणि मानवी हक्कांची पायमल्ली समोर येते. आज सर्वच भारतीय भाषांमध्ये दलित साहित्याचा उगम झाला आहे. यात अजय नावरियांसारखे तरुण लेखक आपल्या 'तीसरी दुनिया' सारख्या लघुकथांतून दलितांसमोरील आव्हाने मांडत आहेत. कौशल्या बैसंत्री यांनी 'दोहरा अभिशाप' हे हिंदीतील पहिले दलित महिला आत्मचरित्र लिहिले. यात त्यांनी जातीय शोषणासोबतच लैंगिक शोषणाचे पदर उलगडले आहेत.
तमिळ लेखिका 'बामा' यांचे 'करुक्कू' हे आत्मचरित्र जगभरात गाजले. तसेच मल्याळममधील के. जे. बेबी हे कवी आणि चित्रपट निमार्ते म्हणून जगप्रसिद्ध आहेत. ही बहुभाषिक संपन्नता सर्वच प्रकारच्या लेखकांसाठी प्रेरणादायी आहे, असेही गर्ग यावेळी बोलताना म्हणाल्या.

## राहुल नार्वेकर यांच्यावर...
या तक्रारीची दखल घेत आयोगाने संबंधित प्रकरणावर तातडीने पावले उचलत पालिका आयुक्तांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. कुलाबा विधानसभा मतदारसंघातील प्रभागातून राहुल नार्वेकर यांचे बंधू मकरंद नार्वेकर, बहीण गौरवी शिवलकर आणि वहिनी हर्षदा नार्वेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. या प्रक्रियेदरम्यान राहुल नार्वेकर स्वतः उपस्थित होते. याच उपस्थितीवरून वादाला तोंड फुटले आहे. इतर राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आरोप केला आहे की, नार्वेकर यांच्या उपस्थितीमुळे दबावाचं वातावरण निर्माण झालं आणि काही उमेदवारांना अर्ज भरण्यापासून रोखण्यात आलं. या प्रकरणी काही राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी थेट राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करत कारवाईची मागणी केली आहे. माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी तर यावर अधिक गंभीर आरोप करत सांगितले की, इतर उमेदवारांचे अर्ज अवैध ठरवून राहुल नार्वेकर यांना आपल्या नातेवाइकांना बिनविरोध निवडून आणायचे होते. त्यामुळेच हा दबावाचा प्रकार घडल्याचा त्यांचा दावा आहे.

## छ. संभाजी महाराजांच्या...
या दोन्ही स्थळांच्या विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ५३२.५१ कोटी किमतीच्या विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. महसूल विभागाने आज जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, के.ई.एम. रुग्णालयाची वढू बुद्रुक येथील गट नं. ४४७ आणि ४४८ मधील एकूण ०.८७ हेक्टर २० आर जमीन छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळाच्या कामासाठी तात्काळ हस्तांतरित केली जाणार आहे.